अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | रविवार, दि. १३ ऑगस्ट २०२३ | वर्ष : २१ वे अंक : ३१५ वा किंमत : ५ रुपये पाने ८






## हिंगलाजमाता पतसंस्थेच्या सभासदांना १५ टक्के लाभांश

**सोलापूर** : पूर्वभागातील सहकार क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या हिंगलाजमाता नागरी सहकारी पतसंस्थेस यंदाच्या वर्षी ५९.६४ लाखांचा विक्रमी नफा झाला असून सभासदांना १५ टक्के लाभांश देण्यात येत असल्याचे संस्थेचे अध्यक्ष दत्तात्रेय पुकाळे यांनी जाहीर केले. जिल्हा कार्यक्षेत्र असलेल्या संस्थेची २६वी वार्षिक सर्वसाधारण सभा अध्यक्ष पुकाळे यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. त्यांनी संस्थेच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेतला. प्रास्ताविक संचालक प्रकाश कटारे यांनी केले. संस्थेचे व्यवस्थापक राजेश क्षीरसागर यांनी अहवाल वाचन केले. संस्थेच्या ठेवीत ७ कोटी वाढ होऊन या ठेवी ३५.५ कोटी झाल्या असून कर्जवाटप ३० कोटी इतके करण्यात आले. संस्थेने १५ कोटींची गुंतवणूक केली असून संस्थेचा मिश्र व्यवसाय ६५ कोटींचा झाला आहे.

संस्थेला निव्वळ नफा ५९.६४ लाख इतका झाला असून एकूण अनुत्पादक कर्ज (एनपीए) शून्य टक्के असल्याची माहिती देऊन सभासदांना १५ टक्के लाभांश देण्याचे अध्यक्ष पुकाळे यांनी जाहीर केले. सभेस सुनील अण्णे, श्रीकांत अंबुरे, जगदीप दंतकाळे, विलास पतंगे, सुधीर ढगे, डॉ. संध्या नाईकनवरे, शिल्पा क्षीरसागर, शोभा आकुडे हे संचालक उपस्थित होते. या सभेत राजकुमार हंचाटे, किरण क्षीरसागर, महानंदू कटारे, रवींद्र खमितकर, व्ही. डी. पतंगे यांनी संस्थेच्या प्रगतीबद्दल मनोगतात समाधान व्यक्त केले. आभार संस्थेचे उपाध्यक्ष विजय पेंडकर यांनी मानले.



## चले जाव चळवळीत महिलांचे मोलाचे योगदान : प्रा. गिरी

**सोलापूर** : महात्मा गांधींच्या चळवळी आणि सोलापूर यांचे अतूट नाते होते. महात्मा गांधींच्या चलेजाव चळवळीत सोलापूरच्या महिलांनी मोलाचे योगदान दिले होते. यामध्ये सुमतीबाई शहा, द्वारकाताई देशपांडे, रमाबाई पिंगे यांचा आवर्जून उल्लेख केला जातो, असे प्रतिपादन प्रा. सोनाली गिरी यांनी केले.

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयात आयक्यूएसी विभाग, इतिहास विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीदिनानिमित्त चले जाव चळवळीत सोलापूरच्या महिलांचे योगदान या विषयावर प्रा. सोनाली गिरी यांचे व्याख्यान आयोजित केले होते, त्यावेळी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. अशोक एक्कलदेवी होते. यावेळी डॉ. ॲनी जॉन यांची उपस्थिती होती. यावेळी गिरी म्हणाल्या, 'सोलापूरमधील १९४२च्या आंदोलनात गांधीजींच्या हाकेला प्रतिसाद देत स्त्रियांनी देखील आपला खारीचा वाटा उचलला. इंदिराबाई अंत्रोळीकर, कलावती जाधव, जनाबाई जाधव, विमलाबाई जक्कल आदी स्त्रियांनी तिरंगा ध्वज हाती घेऊन मोर्चा काढला. शेवटी टिळक चौकात येऊन सुमतीबाई शहा यांच्या हस्ते तिरंगा ध्वज फडकविण्यात आला. एवढा मोठा मोर्चा बघून लोकांच्या मनातील भीती गेली. सुमतीबाई शहा, वत्सलाताई आपटे-देशमुख यांनी भूमिगत राहून काम केले. विदेशी वस्त्रांची होळी केली. भूमिगत लोकांची राहण्याची, खाण्याची, जेवणाची व्यवस्था केली. शीला पत्की यांनी पिस्तुलाने भरलेला पेटारा पोलिसांच्या समोरुन नजर चुकवत आपल्या भावी पतीकडे सुपूर्द केला.' प्रास्ताविक प्रा. डॉ. टी. एन. शिंदे इतिहास विभाग प्रमुख यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. नानासाहेब गव्हाणे यांनी केले तर आभार प्रा. डॉ. शंकर राजे कार्यक्रम अधिकारी रा. से. योजना यांनी मानले.



## जी. के. बहुउद्देशीय संशोधन संस्थेचा वर्धापन दिन साजरा

**सोलापूर** : येथील जी. के. मागासवर्गीय बहुद्देशीय संशोधन संस्थेचा ७वा वर्धापनदिन कार्यक्रम व समाजसेवक कै. शिवप्पा नागप्पा गायकवाड यांच्या ११व्या पुण्यतिथीनिमित्त विधायक उपक्रम समाजकल्याण केंद्र, रंगभवन चौक सोलापूर येथे घेण्यात आले. वर्धापनदिनानिमित्त निराधार विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप तसेच संजय गांधी श्रावण बाळ योजनेचे मंजूर अनुदान पत्राचे वाटप, समाजातील निराधार भगिनी कर्तृत्ववान महिलांचा सत्कार समारंभ व विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते.

वर्धापनदिन कार्यक्रम प्रमुख पाहुणे म्हणून आंबेडकर चळवळीत ज्येष्ठ नेते तथा गवई गटाचे प्रदेश अध्यक्ष सुबोध वाघमोडे, ओमसाई प्रतिष्ठानचे अध्यक्ष शिवराज गायकवाड, डॉ. समीर पटेल, सुवर्णराज महिला मंडळाच्या अध्यक्षा सुवर्णा झाडे-खेलबुडे, वैजिनाथ बिराजदार, राम हुंडारे आदी उपस्थित होते. प्रारंभी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. तद्नंतर उपस्थित सर्वच प्रमुख पाहुण्यांचा सत्कार संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संतोष गायकवाड यांनी पुष्पगुच्छ देऊन केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संतोष गायकवाड यांनी केले.

कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी संस्थेचे पदाधिकारी युवा नेतृत्व सुजल गायकवाड, सहसचिव ज्ञानेश्वर पवार, कार्याध्यक्ष महेश उंबरगीकर, गणेश सुरवसे, गणेश जानकर, ईश्वर बेलभंडारे, विष्णु कांबळे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास महिला भगिनी सुरेखा सलगर, सुनीता बडवणे, संगीता कांबळे, शशिकला पवार, नजीरा शेख, विदा सलगार, कविता बायस, सरोज जमादार, लक्ष्मीबाई सलगर, प्रभावती निचळ, स्मिता विभूते, राजश्री जाधव, निर्मला इंगळे, पद्मा मोळक, सुभाष इंगळे, रमाकांत गणेशकर आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन सिद्धार्थ भडकुंबे यांनी केले तर आभार संतोष गायकवाड यांनी मानले.

# ध्येय प्राप्तीसाठी जीवाचे रान करून यश संपादन करा : सरदेशपांडे



सुराज्य/अक्कलकोट

शाळा आपल्याला घडवण्याचं काम करते. विद्यार्थी जीवनात शिस्त असायला हवी सकाळी उठणे, व्यायाम करणे, प्रामाणिक अभ्यास करणे, विद्यार्थी जीवनात वेळ मिळाल्यास व्यक्त व्हा, दडपण घेऊ नका मोबाईलचा वापर टाळा सध्याचे वय आकर्षणाचे आहे. काय चांगलं काय वाईट याचे भान ठेवावे व त्यास बळी पडू नये. जन्म कोणत्या घरात व्हावं हे आपल्या हातात नाही. मेहनत व चांगले प्रयत्न गरजेचे आहे. जे काही करायचं आहे ते स्वतःच्या हिमतीवर करा, विद्यार्थ्यांनो मोबाईल अतिक्रमणापासून लांब राहा ध्येय प्राप्तीसाठी जीवाचे रान करून यश संपादन करा, असे प्रतिपादन पोलीस अधिक्षक सरदेशपांडे यांनी केले.

श्री रामलिंगेश्वर प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये शालेय विद्यार्थी मोफत गणवेश वाटप कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी ते बोलत होते.

प्रारंभी ग्रामदैवत श्री रामलिंगेश्वर यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक प्राचार्य सुधीर सोनकोडे तर प्रमुख अतिथी परिचय महेश पट्टणशेट्टी यांनी करून दिला. तसेच विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते गणवेश वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. भीमाशंकर बिराजदार यांनी मार्गदर्शन करताना म्हणाले की, 'मोठे होण्यासाठी मोठ्यांचे ऐकले पाहिजे, स्वतःला कमी लेखू नका, इच्छा असेल तर यश सत्यात उतरवण्यासाठी प्रयत्न करायला कधीही मागे पडायचे नाही. चांगल्याला चांगले म्हणण्याचे धाडस विद्यार्थ्यांमध्ये असावे. भारतास २०४७ पर्यंत आत्मनिर्भर आणि विकसित राष्ट्र बनवण्याचा निश्चय करुया, असे मत यावेळी व्यक्त केले. त्याचबरोबर यावेळी उपस्थित मान्यवर व विद्यार्थी पंचप्रण शपथ घेऊन भारताच्या उज्ज्वल यशात आपणही सामील होऊन आत्मनिर्भर विकसित राष्ट्र बनवण्याचे स्वप्न साकारण्याचे शपथ घेण्यात आली.

सूत्रसंचालन राजीव कोरे तर आभार महेश पट्टणशेट्टी यांनी मानले.

यावेळी वळसंग पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल सनगल्ले, युवा उद्योजक महेश बिराजदार, पोलीस पाटील सिद्धाराम वळसंगे, डेप्युटी सरपंच पैगंबर मुल्ला, तंटामुक्ती अध्यक्ष राजेंद्र जाधव, महादेव होटकर, रामलिंग उदंडे, निवृत्त ग्रामविकास अधिकारी शिवलिंगप्पा वंगे, कल्लप्पा म्हेत्रे, शिवराज बिराजदार, द्यानेश्वर विभूते, शाळेतील सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी तसेच बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# भावसार प्रतिष्ठानतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



सुराज्य/सोलापूर

दरवर्षीप्रमाणे यंदाच्या वर्षी भावसार प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेमार्फत समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार शिवस्मारक सभागृह येथे पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साई प्रतिष्ठानच्या सचिवा इंडियन मॉडेल स्कूलच्या संस्थापिक सायली जोशी तसेच हिंगलाज माता पतसंस्थेच्या संचालिका शोभा आकुडे व भावसार प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष दिलीप पतंगे हे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात हिंगलाज मातेच्या पूजनाने करण्यात आली. यावेळी ५१ विद्यार्थ्यांना भेटवस्तू व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी इ. १०वीतून गुणवंत ठरलेल्या हरी श्रीनिवास अंबरकर ९६.६० टक्के, पावणी शैलेंद्र घनाते ९४.४० टक्के, आर्यन दीपक महिंद्रकर ९३.२० टक्के, इ. १२वीतून गुणवंत ठरलेल्या दिव्या गणेश कटारे ९३.६७ टक्के, अमित अनिल तांदळे ९१.६७ टक्के, जान्हवी संतोष सुलाखे ८९.६७ टक्के, मनस्वी अमर क्षीरसागर ८५.८३ टक्के, तसेच पदवीधरमधून स्नेहा विजय महिंद्रकर, वर्षाराणी भारत वासेकर, भावना जाधव, मिताली लाडे, वैभवी बबलादी यांचा भेटवस्तू व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. नीट परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल समर्थ नागेश दंतकाळे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविक व स्वागत प्रतिष्ठानचे अध्यक्ष गिरीश माळवदकर तर पाहुण्यांची ओळख अतुल भावसार यांनी करुन दिली. बक्षीसाचे वाचन वैशाली हिबारे यांनी केले. सूत्रसंचालन गोपी नवले तर आभार सुजाता माळवदकर यांनी मानले. यावेळी व्यासपीठावर अरुण आकुडे हे उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुनील डोईजोडे, सतीश हिबारे, महेश बबलादी, किशोर सूत्रावे, संतोष आकुडे यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला विजय पुकाळे, बाबुराव हंचाटे, मल्लिनाथ बासुतकर, शशिकांत रंगदाळ, रवी खमितकर, अशोक महिंद्रकर, राजेंद्र मिरजकर, किसन गर्जे, श्रीकांत अंबुरे, प्रवीण उत्तरकर, राजू जाधव, उपाध्यक्ष नवीन तापसे उपस्थित होते.

# प्रिसिजन फौंडेशनचा 'कारीगर'मध्ये उपक्रम

सुराज्य/सोलापूर

प्रिसिजन फौंडेशन संचलित सर्वकष लैंगिक शिक्षण कार्यक्रम बेगम कमरुनिसा कारीगर गर्ल्स हायस्कूलमध्ये झाला. कार्यक्रमाची सुरुवात इ. ९वीतील शिक्षकांची बैठका घेऊन करण्यात आला. या बैठकीचे अध्यक्ष म्हणून हायस्कूलच्या मुख्याध्यापिका सबीना इंगळगी या होत्या. एकूणच या लैंगिक शिक्षणाच्या विषयांची संपूर्ण माहिती देण्यात आली आणि गैरसमज दूर करण्यात आले. एकूणच या कार्यशाळेसाठी इ. ९वीतील तीनशे मुली उपस्थित होत्या. सर्वकष लैंगिक शिक्षणाविषयीची पीपीटीद्वारे, व्हिडिओ डॉक्युमेंटरी, केसस्टडी आणि बास्केट गेम्सच्या माध्यमातून विद्यार्थिनींना देखील सात विषयांविषयी मार्गदर्शन करण्यात आले. आजच्या धकाधकीच्या युगामध्ये तोंडाच्या कॅन्सरचे युवकांमध्ये प्रमाण वाढत असल्यामुळे सोलापूर कॅन्सर सोसायटीचे मेडिकल ऑफिसर डॉ. विजया होमकर यांनी मार्गदर्शन केले. लहान मुलांना अडचणीच्या कालावधीत मदत करणारी टोल फ्री नंबर १०९८ चाईल्ड लाईन याविषयी श्रीदेवी राजपूत यांनी मार्गदर्शन केले. बालकल्याण समिती अध्यक्ष समीर सय्यद आणि बाल संरक्षणाबाबत असणारे कायदे, तरतुदी, पूर्तता, बालकांचे अधिकार, पोक्सो कायदा, बालविवाहबंदी आणि विविध योजना याविषयी मार्गदर्शन केले.

हा कार्यक्रम प्रिसिजन फौंडेशनचे अध्यक्ष डॉ. सुहासिनी शहा, माधव देशपांडे, वैशाली बनसोडे, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया शाखेचे चेअरपर्सन डॉ. एन. बी. तेली, डॉ. श्रीकांत येळेगावकर, डॉ. आयेशा रंगरेज, डॉ. नभा काकडे, डॉ. विजया महाजन, सुगतरत्न गायकवाड आदी मान्यवरांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम यशस्वी झाला. मोफत हिमोग्लोबिनची तपासणी सर्व विद्यार्थिनींची करण्यात आली. यावेळी डॉ. नभा काकडे आणि मुख्याध्यापिका सबीना इंगळगी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

## सो. जि. टेनिकॉईट असो. च्या अध्यक्षपदी डोंगरे, सचिवपदी बाळगे

सुराज्य/सोलापूर





क्रीडा व युवक प्राधिकरण क्रीडा मंत्रालय, भारत सरकार, भारतीय शालेय क्रीडा महासंघ व महाराष्ट्र ऑलिम्पिक असो. मान्यता प्राप्त भारतीय टेनिकॉईट महासंघाशी व संलग्न महाराष्ट्र टेनिकॉईट असोसिएशनशी संलग्न सोलापूर जिल्हा टेनिकॉईट (ग्रामीण) असोसिएशनच्या अध्यक्षपदी विजयराज डोंगरे यांची तर सचिवपदी भिमराव बाळगे यांची एकमताने निवड झाली आहे. उपाध्यक्ष शिवकुमार पाटील, खजिनदार इकबाल शेख, सहसचिव श्रीकांत पुजारी, सदस्य सुरेश सोनवणे, धनंजय धेंडे यांची निवड करण्यात आली आहे.

या निवडीबद्दल महाराष्ट्र टेनिकॉईट असो. चेअरमन डॉ. विजय दर्डा, अध्यक्ष मोहन जोशी, सचिव अनिल वरपे, जिल्हा काँग्रेस अध्यक्ष डॉ. धवलसिंह मोहिते-पाटील, महादेव चाकोते, मुकुंद जाधव, अरुण शर्मा, मनिष सुरवसे, अनुजा कुलकर्णी, क्रीडाधिकारी नरेंद्र पवार, तालुका क्रीडाधिकारी सत्येन जाधव, मनपा क्रीडाधिकारी मुर्तुजा शहापुरे यांनी अभिनंदन केले आहे.

## तात्या कोठेंच्या जयंतीदिनी चित्रकला स्पर्धा




सुराज्य/सोलापूर

संभाजीराव शिंदे विद्या मंदिर संकुलात स्व. विष्णुपंत (तात्यासाहेब) कोठे यांच्या ८६व्या जयंतीनिमित्त शहरस्तरीय चित्रकला स्पर्धेचा उद्घाटन सोहळा पार पडला.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून वैजनाथ कुकडे पोलीस निरीक्षक तसेच संस्था सदस्या डॉ. राधिका चिलका हे लाभले. प्रशालेचे मुख्याध्यापक इप्पलपल्ली, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका तनुजा मारपल्ली, पर्यवेक्षक सतिश मल्लाव, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख प्रा. नवनाथ व्हटकर, रचभरे प्रशालेचे मुख्याध्यापक रचभरे हे उपस्थित होते.

प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विद्येची देवता माता सरस्वती देवी आणि स्व. विष्णुपंत कोठे यांच्या प्रतिमापूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. सूत्रसंचालन राखी कोंगारी यांनी केले तर आभार दत्तात्रेय नरुटे यांनी मानले.

## जे. जे. प्रतिष्ठानतर्फे आज महिलांसाठी स्पर्धा

**सोलापूर** : जे. जे. प्रतिष्ठान, सोलापूर यांच्यावतीने भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त सोलापुरातील स्वकुळसाळी समाजातील सौभाग्यवती महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी संस्थेच्यावतीने रविवार १३ ऑगस्ट रोजी दुपारी ४ वाजता होम मिनिस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा अक्षय ग्रँड फंक्शन हॉल, एस. एस. आयकॉनच्या बोळात, गोंधळी वस्ती रोड, गांधी नगर, अक्कलकोट रोड येथे घेण्यात येणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वकुळसाळी ज्ञाती संस्थेचे सचिव जयहरी साखरे व प्रमुख उपस्थिती श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव समितीचे अध्यक्ष गिरीष गुळेद आणि समाजातील व सर्व संस्थेचे सभासद व महिला व सर्व समाजबांधव उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचे परीक्षक सोनल एकबोटे, अनुराधा काजळे, सरोजा गदगे, जयश्री सपार, कविता येडके, गीताभारती जिंदे, लक्ष्मी टोणपे, तर सूत्रसंचालन उमा जिंदे, संदीप सरवदे व अपूर्वा येडके हे करणार आहेत.

## समाजवादी पार्टी युवा जिल्हा अध्यक्षपदी आदम मुलाणी यांची नियुक्ती



**सोलापूर** : समाजवादी पक्षाचे जुने प्रमुख कार्यकर्ते साथी आदम बशीर मुलाणी यांची सोलापूर जिल्हा युवा समाजवादी पक्षाच्या जिल्हा अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

सदरची नियुक्ती जिल्हा अध्यक्ष अबुतालीब डोंगरे यांनी केली आहे. मुलाणी यांची नियुक्ती झाल्याबद्दल सोलापूर जिल्ह्यात युवकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. तसेच समाजवादी पार्टी महाराष्ट्र प्रदेशचे अध्यक्ष आमदार साथी अबुआजमी यांनी आदम मुलाणी यांची नियुक्ती झाल्याबद्दल अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या आहेत.

# वाघोली ग्रा.पं.तर्फे विविध विकासकामांचे भूमिपूजन

सुराज्य/माळीनगर



वाघोली (ता. माळशिरस) ग्रामपंचायतच्यावतीने विविध विकासकामांचे भूमिपूजन समारंभाचे आयोजन केले होते. विकास कामाच्या भूमिपूजन नंतर जाहीर सभेत शिवामृत दूध उत्पादक संघाचे चेअरमन व पंचायत समिती माळशिरसचे माजी सभापती धैर्यशील मोहिते पाटील ऊर्फ भैय्यासाहेब यांनी वरील आश्वासन दिले.

वाघोली ग्रामपंचायतच्यावतीने जन सुविधा योजनेअंतर्गत स्मशानभूमी दुरुस्ती व सुशोभीकरण करणे -१९ लाख रुपये, १५ वा वित्त आयोग अंतर्गत प्राथमिक आरोग्य उपकेंद्र वाघोली रुपये २.०० लाख साहित्य वाटप, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाघोली येथे पाणी टाकी बांधणे -२.०० लाख रुपये, गावातील सर्व जिल्हा परिषद शाळांना स्मार्ट टीव्ही संच पुरवणे -२.००लाख रुपये ५) दलितवस्ती सुधार योजनेतून अंतर्गत रस्ते कॉंक्रिट करणे व बंदिस्त गटार करणे -१२ लाख रुपये अशा ३५ लाख रुपयांच्या विकास कामाचे भूमिपूजन करण्यात आले.

भूमिपूजनाच्या वेळी अकलूज ग्रामपंचायतचे माजी सरपंच शिवतेसिंह मोहिते-पाटील, पंचायत समिती माळशिरसचे गटविकास अधिकारी गुळवे यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले.

सदर कार्यक्रमावेळी शिवामृत दूध उत्पादक संघाचे चेअरमन श्री धैर्यशील मोहिते-पाटील यांनी वाघोली गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांचे प्रयत्नातून भरघोस असा निधी देऊन सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करू, असे आश्वासन यावेळी दिले. तसेच पंचायत समिती माळशिरसचे गटविकास अधिकारी विनायकजी गुळवे यांच्या ग्रामपंचायत राबवत असलेल्या सर्व विकासकामांचा आढावा घेऊन समाधान व्यक्त केले.

विकास कामात कुठलीही अडचण आली तरी प्रशासन स्तरावर ती सोडवण्याचा प्रयत्न करू असे मनोगत सांगितले. अकलूजचे माजी सरपंच शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांनी आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांचे सहकार्यातून वाघोली गावच्या विकासासाठी जास्तीत जास्त निधी देण्याचा प्रयत्न करू असे सांगितले.

प्रास्ताविक युवा उद्योजक तुषार पाटोळे यांनी केले. याप्रसंगी जिल्हा परिषद बांधकाम उपविभागाचे उपअभियंता रणवरे, शाखा अभियंता सरडे रावसाहेब, पुणे विभागीय मराठा सेवा संघाचे अध्यक्ष उत्तमराव माने, पुणे जिल्हा परिषदेचे माजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी भारत शेंडगे, धनंजय सावंत, पोपट भोसले, महाळुंग नगरपंचायतचे उपनगराध्यक्ष भीमराव रेडे पाटील, गोविंद पवार, विनायक पराडे, संगमचे महेश इंगळे, विराज निंबाळकर, प्रशांत पाटील, दत्तात्रय चव्हाण ग्रामपंचायतचे मार्गदर्शक विष्णू वासुदेव मिसाळ, कालिदास कृष्णा मिसाळ, ग्रामपंचायतचे सरपंच वृशाली माने शेंडगे, उपसरपंच पंडित मिसाळ ग्रामपंचायत सदस्य तसेच रोडे भाऊसाहेब, जि. प. शाळेचे शिक्षकवृंद, आरोग्य विभागाचे डॉ. संकल्प जाधव उपस्थित होते. सूत्रसंचालन राजेंद्र मिसाळ यांनी केले. आभार लक्ष्मण पारसे यांनी मानले.

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | रविवार, दि. १३ ऑगस्ट २०२३ |


## सोलापुरातील सराईत दुचाकी चोरट्यांना सांगलीत बेड्या

सुराज्य/सोलापूर

### १७ दुचाकीसह सात लाख ६३ हजारांचा मुद्देमाल जप्त

आष्टा, हडपसर, जेजुरी, विश्रामबाग, कोरेगाव, पुसेगाव आणि फलटण पोलिस ठाण्याच्या हद्दीतील गुन्हे उघडकीस आले आहेत. या तिघांनी सांगली जिल्ह्यासह अन्य जिल्ह्यात दुचाकी चोरल्या होत्या. सांगली पोलिस: सांगलीमध्ये आष्टा पोलिसांनी दुचाकींची चोरी करणाऱ्या सोलापूर जिल्ह्यातील तिघा सराईतांना अटक करत त्याच्याकडून तब्बल १७ दुचाकीसह सात लाख ६३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

नामदेव बबन चुनाडे, महादेव भोसले, गणेश भोसले अशी आरोपींची नावे असून हे सर्व सोलापूर जिल्ह्यातील आहेत. या तिघांनी सांगली जिल्ह्यासह अन्य जिल्ह्यात दुचाकी चोरल्या होत्या. तिघांना बेड्या ठोकण्यात आल्याने आष्टा, हडपसर, जेजुरी, विश्रामबाग, कोरेगाव, पुसेगाव आणि फलटण पोलिस ठाण्याच्या हद्दीतील गुन्हे उघडकीस आले आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आष्टामधील अप्पर तहसील कार्यालयाजवळ संजय भानुसे यांची दुचाकी चोरीला गेल्यानंतर फिर्याद दिली होती. आष्टा पोलिसांनी गोपनीय बातमीदारामार्फत बातमी मिळाल्यानंतर पोलिसांनी कारवाई करत बेड्या ठोकल्या. आष्टा पोलीस ठाणे हद्दीतील सांगली इस्लामपूर रस्त्यालगत एका दुचाकीवरून संशयित संशयितस्पदरित्या वावरत होता.

# सरकारचे धोरण, शेतकऱ्यांचे मरण

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

काही दिवसांपूर्वी टोमॅटोचे दर द्विशतकी पार केल्यानंतर सर्वसामान्यांच्या तोंडचे पाणी पळाले होते.आता सर्वसामान्यांना कांदा रडवणार असे दिसते.गेल्या दोन दिवसात कांद्याच्या भावात वाढ होत असल्याने गरीब आणि कष्टकऱ्यांची कांदा आणि भाकरी महाग होण्याची चिन्हे दिसत आहेत. कांद्याचे दर वाढू लागताच केंद्र सरकारची झोप उडाली आहे. देशांतर्गत कांद्याची वाढलेली मागणी व स्थानिक बाजार समित्यांमध्ये घटलेली 'आवक' यामुळे कांद्याच्या दरात वाढ होते आहे. कांदा दरात वाढ झाल्याने शेतकरी सध्या सुखावला असला तरी वाढते दर नियंत्रणात आणण्यासाठी केंद्र सरकारने नाफेड (नॅशनल ॲग्रिकल्चर को-आपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन ऑफ इंडिया) मार्फत खरेदी केलेला तीन लाख मेट्रिक टन कांदा किरकोळ बाजारात आणण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. या निर्णयामुळे सर्वसामान्यांना जरी दिलासा मिळणार असला तरी शेतकऱ्यांना मात्र याचा मोठा फटका बसण्याची शक्यता आहे.सरकारचे धोरण,शेतकऱ्यांचे मरण हा नित्याचाच अनुभव शेतकऱ्यांना येणार असे दिसते.

## इकडे कांद्याचा दर वाढला, तिकडे 'नाफेड'चा आणला



### केंद्र सरकार पेचात...

भाज्यांच्या दरातील चढ-उतार हा प्रश्न केंद्र सरकारसाठी कळीचा मुद्दा असतो.महागाई वाढली की,सर्वसामान्य चीड व्यक्त करतात तर मालाचे भाव गडगडले की शेतकरी संताप व्यक्त करतात.भाज्यांचे दर नियंत्रणात आणण्यासाठी सरकारला भाज्यांची आयात करावी लागते.टोमॅटोने द्विशतक गाठल्यानंतर सरकारने टोमॅटोची आयात केली.त्यामुळे आज टोमॅटोचे दर गडगडले.५० रूपये किलोने टोमॅटो विकला जात आहे.कांद्याचे भाव वाढू लागताच सरकार खडबडून जागे झाले.देशातील सर्वसामान्यांच्या हितासाठी नाफेडचा कांदा बाजारात आणावा लागत आहे.सामान्य जनता पहायचे की शेतकरी या पेचात केंद्र सरकार नेहमीच सापडत असते.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



रस्ते आहेत की कोंडवाडा?

कल्याण
348-57-359

गारपीट व अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाल्यानंतर शेतकऱ्याच्या कांद्याला भाव मिळेल, अशी आशा होती. मात्र मे-जून महिन्यात उन्हाळी कांद्याला केवळ ७०० रुपयांच्या आसपास भाव मिळाला होता. त्यावेळी राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी नाफेड आणि द.नॅशनल को-कन्झुमर्स फेडरेशन ऑफ इंडिया अर्थात एनसीसीएफच्या वतीने राज्यात तीन लाख मेट्रिक टन कांद्याची खरेदी करण्यात आली होती. आता तोच कांदा सर्वसामान्य ग्राहक केंद्रस्थानी ठेवत तो पुन्हा बाजारात दाखल करत किरकोळ बाजारातील कांद्याचे वाढते दर नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केंद्र सरकारच्या ग्राहक व्यवहार मंत्रालयाच्या निर्देशानुसार सुरू असल्याचे सांगण्यात येते.

या निर्णयाला शेतकऱ्यांसह बाजार समित्यांच्या संचालकांनी देखील विरोध केला आहे. आज कांद्याला सरासरी २१०० रुपये भाव मिळत आहे. केंद्र सरकारच्या ग्राहक व्यवहार मंत्रालयाच्या या निर्णयामुळे कांदा उत्पादक शेतकरी मात्र चांगलाच संतापला आहे. कांद्याला भाव नाही म्हणून कांदा चाळीत साठवून ठेवला, त्यातील ५० टक्क्यांहून अधिक कांदा हा खराब झाल्याने उकिरड्यावर फेकून द्यावा लागला. गेली चार महिने चाळीतल्या कांद्यावर खर्च करून तो सांभाळला. आता मात्र कांद्याला चांगला

### तर थेट घरीच नेऊन द्या ना

कांद्याला सध्या २ हजार १०० रुपये सरासरी भाव आहे. हा भाव ५ हजार रुपये जरी झाला तरी शेतकऱ्यांचे नुकसान भरून निघणार नाही. जेव्हा कांद्याचे भाव कोसळले होते तेव्हा कुठे गेले होते हे सरकार? असा सवाल करत सर्वसामान्यांचे हित बघण्यासाठी जर हा निर्णय घेतला असेल तर नाफेड मार्फत खरेदी केलेला कांदा बाजारात न उतरवता थेट ग्राहकांच्या घरीच नेऊन द्या, असा संतप्त सवाल शेतकऱ्यांनी उपस्थित केला आहे..

टन कांदा बाजारात उतरवायचा निर्णय घेतला. केंद्राचे हे धोरण म्हणजे शेतकऱ्याचे मरण असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

कांदा लागवडीपासून तर कांदा काढणीपर्यंत शेतकऱ्याला साधारण ६० ते ७० हजार रुपये एकरी खर्च येत असतो. खर्च देखील वसूल होत नाही. अशातच कुठेतरी कांद्याला जर चांगला भाव मिळाला तर बिघडले कुठे? केंद्र सरकारच्या ग्राहक व्यवहार मंत्रालयाने घेतलेला हा निर्णय मागे घ्यावा असेही काही शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. नाशिक जिल्ह्यात तीन दिवसांपूर्वी कांद्याचे दर बाजारात दाखल करण्याचा निर्णय होताच बाजार समितीत कांद्याचे भाव क्विंटलमागे २०० ते ३०० रुपयांनी घसरले आहेत. नाफेडने खरेदी केलेला कांदा जर बाजारात प्रत्यक्ष दाखल झाला ते कांदा दर आणखी कोसळण्याची शक्यता आहे.



सोलापूर शहराची गरज, विकासाचे पहिले पाऊल याचे साक्षीदार व्हा!





आय.टी.पार्क चे भुमिपुजन व
ह्युमनाईड रोबोट 'स्व' चे अनावरण

शुभहस्ते
मा. श्री. शरदचंद्रजी पवार साहेब
(राष्ट्रीय अध्यक्ष,राष्ट्रवादी कॉंग्रेस कमिटी)
मा.श्री. जयंत पाटील (माजी जलसंपदामंत्री)

प्रमुख उपस्थिती
मा. मुकुंद विष्णुपंत जगताप
(आर्यन्स ग्रुप ऑफ कंपनीचे चेअरमन)
श्री. अतुलजी चोरडिया (उद्योजक)
श्री. सतीशजी मगर (उद्योजक)

आयोजक
श्री. महेश (आण्णा) कोठे व
सौ. स्मिता मनोहर शितोळे-जगताप
(एम.डी आर्यन्स ग्रुप ऑफ कंपनी)
यांच्या संयुक्त विद्यमाने

आर्यन्स
Aaryans Group Of Companies

आर्यन्स ग्रुप ऑफ कंपनीज विविध क्षेत्रात आपला विस्तार करीत आहे.
ऑटोमोबाईल, ग्रीन एनर्जी, पेट्रोकेमिकल्स, गोल्ड रिफायनरी, हॉस्पिटॅलिटी, एव्हिएशन, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, फार्मास्युटिकल्स, फायनान्स, एग्रीकल्चर, मीडिया आणि एंटरटेनमेंट चॅनेल या आणि अशा विविध क्षेत्रात आर्यन्स ग्रुप ऑफ कंपनीज कार्यरत आहे.

रविवार दि. १३ ऑगस्ट २०२३ सकाळी १०.३० | सलगरवाडी, अक्षत पामजवळ, डोणगाव रोड, सोलापूर.

# इंद्रभुवनमध्ये आयुक्तांचे कार्यालय ऑगस्ट अखेरपर्यंत होणार स्थलांतरीत

सुराज्य/सोलापूर

स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन अंतर्गत इंटिग्रेटेड कमांड अँड कंट्रोल सेंटर सप्टेंबर अखेरपर्यंत सुरू करण्यात येणार आहे. त्याचबरोबर इंद्रभुवन इमारतीतील फर्निचर सह इतर कामे लवकरच पूर्ण करण्यात येत असून ऑगस्ट अखेरपर्यंत महापालिका आयुक्तांचे कार्यालय तेथे स्थलांतरित करण्यात येणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी दिली.

सोलापूर महानगरपालिका व स्मार्ट सिटी च्या माध्यमातून नव्याने उभारण्यात येत असलेल्या इंटिग्रेटेड कंट्रोल अँड कमांड सेंटरच्या इमारतीच्या उभारणी काम अंतिम टप्प्यात आले आहे.



येत्या सप्टेंबर अखेरपर्यंत हे सेंटर सुरू करण्याचा प्रयत्न आहे, असे महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी सांगितले.

शहरातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी संपूर्ण शहरातील सुरक्षा व्यवस्थेवर देखरेख व नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्र शासनाच्या महत्वकांक्षी अशा इंटिग्रेटेड कमांड अँड कंट्रोल सेंटरच्या अमंलबजावणीसाठी नियंत्रण कक्षाची आवश्यकता



होती. त्यामुळे सोलापूर महानगरपालिका प्रशासकीय इमारतीच्या पाठीमागील बाजूस असणाऱ्या जागेत अभियंता कार्यालयाकडील भांडार गृहाच्या ठिकाणी, नियंत्रण कक्षाची उभारणी करण्यात येत आहे.

या इमारतीमध्ये शहरात स्मार्ट सिटी योजनेंतर्गत बसविणेत येणारे सीसीटीव्ही, एलईडी दिवे, कचरा संकलन केंद्राच्या गाड्या, पाणीपुरवठा वितरण प्रणाली व स्काड प्रणाली, ड्रेनेजबाबत तक्रारी, अग्निशमन विभाग, आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत येणाऱ्या तक्रारिंची नोंद घेऊन त्यांचे निवारण करण्यात येईल. एकाच ठिकाणाहुन या सर्व घडामोडींवर देखरेख होणार आहे.

या ठिकाणी नागरिकांकरीता सोलापूर मनपाकडील, पोलिसांकडील आवश्यक त्या सुविधाचे एकत्रीकरण करण्यात येणार आहे. या नियंत्रण कक्षामध्ये पाणी व स्ट्रीट लाईट स्काडा प्रणालीचा नियंत्रण विभाग देखील ठेवण्यात येणार आहे. तसेच शहरातील सुरक्षा व्यवस्था अबाधित रहावी यासाठी शहरातील १३२ ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे, आरसीसी याद्वारे एकत्रित केले जाणार आहे. घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत घंटागाडी तसेच मनपाकडील कांही सेवा याद्वारे देण्यात येऊन त्यांचे नियंत्रण केले जाणार आहे. सदर सेंटरचे काम अंतिम टप्यात असून येत्या सप्टेंबरमहिना अखेर पर्यंत सुरू करण्याचा प्रयत्न आहे, अशी माहिती महापालिकेच्या आयुक्त शितल तेली- उगले यांनी दिली. इंटिग्रेटेड कमांड अँड कंट्रोल सेंटरच्या इमारतीमध्ये महापालिकेचे मुख्य लेखापाल आणि मुख्य लेखापरीक्षक या दोन अधिकाऱ्यांची कार्यालयेही स्थलांतरित करण्यात येणार आहे, असेही महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी सांगितले

### मागील बाजूस हायड्रोलिक लिफ्ट असणार

इंद्रभुवन इमारतीमध्ये फर्निचर सह इतर कामे करण्यात येत आहेत. मागील बाजूस हायड्रोलिक लिफ्टही बसविण्यात येत आहे. साधारणतः ऑगस्ट अखेरपर्यंत हे काम पूर्ण होईल आणि त्यानंतर महापालिका आयुक्त आणि उपायुक्त या अधिकाऱ्यांची कार्यालये स्थलांतरित करण्यात येतील, असे महापालिका आयुक्त शितल तेली – उगले यांनी यावेळी स्पष्ट केले.

## जेलमध्ये टाकल्याचा राग धरून काठीने मारहाण

सुराज्य/पंढरपूर

पूर्वीचे भांडण आणि जेलमध्ये टाकल्याचा राग मनात धरून मासिक पित्राच्या आलेल्या सासऱ्याला काठीने बदडून गंभीर जखमी करण्यात आले. ही घटना सुस्ते (ता.पंढरपूर) येथे गुरुवारी रात्रीच्या सुमारास घडली.

या प्रकरणात पंढरपूर तालुक्याच्या पोलिसांनी जावयासह दोघाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे . यासंदर्भात प्रकाश नारायण अवघडे वय (५७ रा.लोंढेवाडी ता.माढा) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी त्यांचा जावई अभिजीत सत्यवान वाघमारे आणि जावयाची आई मंगल वाघमारे (दोघे रा.सुस्ते) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. प्रकाश अवघडे हे नातेवाईकाच्या श्राध्द कार्यक्रमासाठी सुस्ते येथे पत्नीसोबत गेले होते.

कार्यक्रम झाल्यानंतर गुरुवारी मध्यरात्रीच्या सुमारास त्यांच्या जावई अभिजीत वाघमारे याने पूर्वीचे भांडण आणि जेलमध्ये टाकल्याच्या राग धरून प्रकाश अवघडे यांना काठीने बेदम मारहाण केली. त्यात ते गंभीर जखमी झाले. तर त्याची आई मंगल वाघमारे हिने तुमच्या मुलीला घेऊन जा आणि सोडचिठ्ठी द्या. असे म्हणत त्यांना शिवीगाळ आणि धमकी दिली. अशी नोंद पोलिसात झाली आहे. हवालदार खिलारे पुढील तपास करीत आहेत.

## टेंभुर्णीत मोटारीच्या बाहेर काढून दगडाने मारहाण

सुराज्य/टेंभुर्णी

मोटारीतून आई-वडील आणि चुलत्या सोबत जात असताना मोटर अडवून आणि मोटारीच्या बाहेर काढून दगड आणि हाताने केलेल्या मारहाणीत रोहिदास भीमराव खंडागळे (वय ३१ रा . उजनी ता.माढा) हे जखमी झाले. ही घटना टेंभुर्णी येथील वडारगल्ली जवळ असलेल्या कमानीजवळ गुरुवारी रात्रीच्या सुमारास घडली. या प्रकरणात टेंभुर्णीच्या पोलिसांनी विनोद सोनबा जगताप, मधुकर संपत्ती खंडागळे (दोघे रा.टेंभुर्णी) आणि अन्य दोन अनोळखी इसम अशा चौघाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

रोहिदास खंडागळे हे चार चाकी वाहनातून जात असताना विनोद जगताप यांनी मोटर अडवली आणि त्यांना बाहेर काढून मारहाण केली. हवालदार मारकड पुढील तपास करीत आहेत.

### सत्तर फूट येथे तरुणास मारहाण

सत्तर फूट रोडवरील स्टार हॉटेल जवळ धारदार वस्तू आणि लाथा बुक्क्याने केलेल्या मारहाणीत मोहसीन अलीम शेख (वय ३० रा. नवीन घरकुल कुंभारी ता. दक्षिण सोलापूर) हा तरुण जखमी झाला. ही घटना शुक्रवारी रात्रीच्या सुमारास घडली. त्याला उपचारासाठी महेबूब (मित्र) याने शासकीय रुग्णालयात दाखल केले.

## मल्लेवाडी येथे जुगार अड्डयावर पोलिसांचा छापा

लक्ष्मी दहिवडी : मल्लेवाडी येथील मारुती मंदिराच्या बाजूस आडोशाला गोलाकार बसून ५२ पानाच्या पत्यावर मन्ना नावाचा जुगार खेळणाऱ्या ठिकाणी पोलीसांनी छापा मारुन ९७ हजार ६२० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करुन कुमार ज्ञानेश्वर रायबाण (वय ५२), संभाजी विठ्ठल गोडसे (वय ४९),राहुल विलास मरके (वय ४०),सर्जेराव गुलाब मस्के (वय ६० सर्व रा.मल्लेवाडी) या चौघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मल्लेवाडी येथील मारुती मंदिराच्या बाजूला आडोशाला गोलाकार बसून मन्ना नावाचा जुगार काही इसम खेळत असल्याचे गोपनीय माहिती प्रशिक्षणार्थी पोलीस अधिकारी नयोमी साटम यांना मिळताच त्यांनी पोलीसांच्या मदतीने छापा टाकला असता वरील चौघे आरोपी गोलाकार बसून जुगार खेळत असल्याचे निदर्शनास आले. ठिकाणाहून हिरो होंडा मोटर सायकल, रोख रक्कम, मोबाईल असा एकूण ९७ हजार ६२० रुपये किंमतीचा मुद्देमाल पोलीसांनी जप्त केला आहे.

## घर काम करणाऱ्या महिलेने चोरलेले दागिने हस्तगत

सुराज्य/सोलापूर

प्रभाकर महाराज मंदिरालगत असलेल्या आयोध्या नगरात राहणाऱ्या विष्णुकांत नंदकिशोर राठी या व्यापाऱ्याच साडेसात लाखाचे सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम लंपास झाले होती.

फ ौजदार चावडी पोलीस ठाण्याच्या गुन्हे शाखेने तपास करून राठी यांच्या घरात काम करणाऱ्या मोलकणीस सापळा रचून पकडल तिच्या ताब्यातून साडेसात लाखाचे सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम जप्त केली. निकिता अनिकेत बनसोडे (वय-२१,रा.घर नं. १४८ मिलींद नगर,बुधवार पेठ,सोलापूर) असे तिचे नाव आहे. विष्णुकांत राठी,यांच्या बेडरूम मधील कपाटातील चावीने ड्रावर उघडुन कपाटातील १७.४ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने व रोख



४५ हजार रूपये असे एकूण अंदाजे ७ लाख ४१ हजार रुपये किमतीचा ऐवज अज्ञात चोरट्याने चोरून नेला होता. याबाबत फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

या गुन्ह्याचा तपास करत असताना दि.१० ऑगस्ट रोजी गुन्हे प्रकटीकरण पथकास मिळालेल्या माहितीनुसार एक २० ते २५ वर्षाची महिला चोरीचे दागिने विक्री करीता शिवाजी चौक, बाळीवेस रोड, सोलापूर येथे येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार सापळा रचला असताना एक महिला दिसली ती पथकास पाहून पळून जाण्याचा प्रयत्न करीत असताना तिला शिताफीने ताब्यात घेतले.गुन्हयातील मुद्देमालाबाबत चौकशी केली असता ती उडवा-उडवीची उत्तर देवु लागली. त्यामुळे तिची अंगझडती घेतली असता तिच्या ताब्यात काही सोन्याचे दागिणे मिळून आले. तिच्याकडून ६ लाख ३६ हजार रुपये किमंतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

## सेवासदन मधील विद्यार्थिनींचा सत्कार

सोलापूर : सेवासदन कनिष्ठ महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थिनींचा सत्कार मूळचे सोलापूरचे असलेले जर्मनीतील अभियंता अमोल ताड यांच्या हस्ते करण्यात आला.

सेवासदन संस्थेतील नानासाहेब पाठक सभागृहात झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी व्यासपीठावर सेवासदन संस्थेच्या अध्यक्षा प्रा. शीला मिस्त्री, प्राचार्य डॉ. सतीश कुलकर्णी, पर्यवेक्षक प्रा. पद्मकुमार उपाध्ये, प्रा. मधुरा गोगटे उपस्थित होते.

यावेळी प्रथम आलेल्या साक्षी नगरकर हिला सुहासिनी इर्लेकर स्मृती पुरस्कार तर द्वितीय क्रमांक मिळवलेल्या श्रध्दा पाटील आणि प्रगती सुरवसे यांना द्वितीय पुरस्काराने गौरविण्यात आले.



## पिसेवाडी येथे जलजीवन मिशन योजनेच्या कामाचे भूमिपूजन

सुराज्य/वेळापूर

पिसेवाडी येथील १ कोटी ५४ लाख रुपये जल जीवन मिशन योजनेच्या कामाचे आमदार रणजितसिंह मोहिते पाटील व आमदार राम सातपुते यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. यावेळी सहकार महर्षी कारखान्याचे व्हाईट चेअरमन शंकरराव माने देशमुख, माळशिरस पं. स. माजी उपसभापती अर्जुनसिंह मोहिते पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक नितीन सावंत, माजी पं. स. सदस्य नानासाहेब नाईकनवरे, सहकार महर्षी कारखाना माजी संचालक महादेव भाऊ चव्हाण, माजी सरपंच व शिवामृत दूध संघाचे संचालक सुरेश पिसे, भागवत पिसे, माजी सरपंच धनंजय भाकरे, श्रीकांत देशमुख, सरपंच मोहन भाकरे, उपसरपंच भाऊसाहेब पिसे, माजी सरपंच अण्णासाहेब शेंडे, माजी उपसरपंच अशोक भाकरे, वेळापूर माजी उपसरपंच मल्हारी बनकर, बाबासाहेब इंगळे, उमेश भाकरे, पोलीस पाटील सुमंत गायकवाड, ग्रामपंचायत सदस्य पांडुरंग पिसे, सुवर्णा राऊत, ज्ञानेश्वर पिसे, धनाजी साठे, रमेश भाकरे, नागेश जानकर, साहिल आतार, सुनील गायकवाड, ग्रामविकास अधिकारी बनकर भाऊसाहेब व पिसेवाडी ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

## जनता व जुनियर कॉलेजला स्वच्छ सुंदर शाळेचा पुरस्कार



सुराज्य/वेळापूर

मळोली येथील जनता विद्यालय जुनियर कॉलेज ला शैक्षणिक वर्ष २०२२-२३ शैक्षणिक वर्षात श्री संत सोपान काका सहकारी बँक मर्यादित सासवड व श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ सासवड यांच्या संयुक्त विद्यमानाने दिला जाणारा स्वच्छ व सुंदर शाळा तृतीय पुरस्कार जनता विद्यालय व जुनिअर कॉलेज मळोली प्रशालेस प्राप्त झाला आहे. पुरस्कार सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व रोख रक्कम स्वरूपात प्राप्त झाला आहे. सदर पुरस्कार मिळण्यासाठी स्वच्छ शालेय परिसर, शालेय परिसरातील वृक्ष, बंदिस्त कुंपण, विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्यासाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, स्वतःची स्वच्छ पाण्याची व्यवस्था, स्वतंत्र व स्वच्छ स्वयंपाक घर, कार्यालय , स्वतंत्र शिक्षक व शिक्षिका कक्ष हे सर्व निकष पूर्ण करून जनता विद्यालय जुनियर कॉलेज मळोली यांना तृतीय पुरस्कार मिळाला आहे. सदर शाळेला पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष व पंचायत समिती सदस्य रणजीतसिंह जाधव, मुख्याध्यापक बी. आर. जाधव, सर्व शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

## वीर जवानांना मिरवणुकीद्वारे विद्यार्थिनींकडून आदरांजली

सुराज्य/वेळापूर

भारताच्या संरक्षणासाठी प्राणपणाने लढणाऱ्या वीर जवानांना आदरांजली वाहण्यासाठी आई प्रतिष्ठानने शुक्रवारी भू. म. पुल्ली कन्या प्रशालेतील विद्यार्थिनींच्या सहभागाने मिरवणूक काढली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आवाहन केलेल्या 'मेरी मिट्टी मेरा देश' अभियानाअंतर्गत भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर ही मिरवणूक झाली. याप्रसंगी 'भारतमाता की जय', 'वंदे मातरम' चा नारा घुमला.

प्रारंभी भु. म. कन्या प्रशालेत दंतरोग तज्ञ डॉ. विवेक कुलकर्णी यांच्या हस्ते व्याहाती होम करुन मिरवणुकीचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी आई प्रतिष्ठानचे



अध्यक्ष मोहन डांगरे, भु. म. कन्या प्रशालेच्या प्राचार्या गीता सादुल यांची प्रमुख उपस्थिती होती. मिरवणुकीच्या अग्रभागी भारतमाता, राष्ट्रमाता जिजाऊ, झाशीची राणी लक्ष्मीबाई आदी वेशभूषा करून विद्यार्थिनी रथावर स्वार झाल्या होत्या. तसेच काही विद्यार्थिनींनी केशरी, पांढऱ्या आणि हिरव्या रंगांच्या टोप्या परिधान करून वातावरण तिरंगामय केले. शेकडो विद्यार्थिनींनी तिरंगा ध्वज घेऊन या मिरवणुकीत सहभाग घेतला. मिरवणूक मार्गावरील विविध चौकांमध्ये देशभक्तीपर गीतांवर विद्यार्थिनींनी नृत्य सादर केले. तसेच भव्य तिरंग्याचे प्रदर्शन करून सोलापूरकरांना देशभक्तीचा संदेश दिला. कन्ना चौक, राजेंद्र चौक, जोडबसवण्णा चौक, अक्कलकोट रस्ता, भद्रावती पेठ, मार्कंडेय रुग्णालय, दत्त नगर, शिवराम चौकमार्गे मार्कंडेय उद्यानापर्यंत ही मिरवणूक काढण्यात आली. ही मिरवणूक मार्कंडेय उद्यानात आल्यानंतर सहाय्यक पोलीस आयुक्त राजेंद्र मोरे यांच्या हस्ते समारोप कार्यक्रम झाला.

याप्रसंगी सदर बाजार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राघवेंद्र सिंह क्षीरसागर, आई प्रतिष्ठानचे अध्यक्ष मोहन डांगरे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाचे राज्यपाल नियुक्त अधिसभा सदस्य संजय साळुंखे, कल्पना जक्कल यांची प्रमुख उपस्थिती होती.

### सावधानतेची जाहीर नोटीस

आमचे अशिल बशीर इमामसाब पटेल यांनी दिलेल्या माहितीवरुन व त्यांच्या सांगण्यावरुन तमाम लोंकास विशेषत: सोलापूर शहरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन-** डी ॥ व सब डी ॥ सोलापूर, ता. उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दवाढ भागातील मजरेवाडी येथील जुना सर्व्हे नं. 253/1ब व यासी नवीन सर्व्हे नं. 65/1ब या पैकी सत्यसाई नगर मधील प्लॉट नं. 289 यासी म्यु.पल मिळकत नं. 678162 यांसी हद्द पुर्वपश्चिम 40 फुट, दक्षिणोत्तर 25 फुट असे एकूण क्षेत्र 1000 चौ.फुट किंवा 92.93 चौ.मी. इतकी जागा असून त्यात 10x10 फुट मापाची चोहो बाजूने व वरती पन्हाळी पत्रे घातलेली एक खोली असून बाकीची खुली जागा आहे. यासी चतु:सीमा पुढीलप्रमाणे- पूर्वेस- प्लॉट नं. 290, पश्चिमेस- रस्ता, दक्षिणेस- प्लॉट नं. 301 आणि उत्तरेस- प्लॉट नं. 277. येणेप्रमाणे वर नमूद केलेली मिळकत हि अशपाक महिबुबसाहेब पटेल यांच्या मालकी कब्जेवहीवाटीची आहे. अशपाक महिबुबसाहेब पटेल यांनी सदरची मिळकत विक्रीस काढली असता, आमचे अशिलांनी सदरची मिळकत हि योग्य व वाजवी किंमतीस विकत घेण्याची तयारी दर्शवली. त्याप्रमाणे बोलणी होवून आमचे अशिलांस सदरची मिळकत हि कायम खुषखरेदीने देण्याचे मान्य व कबूल केलेले आहे. तसेच सदरची मिळकत हि निर्वेध व निजोखमी असल्याबाबत हमी व खात्री देखील आमचे अशिलांना दिलेली आहे. आमचे अशिल हे सदर मिळकतीचे लवकरात लवकर खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहेत, तरी वर नमूद मिळकतीबाबत कोणीचेही, कसल्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध, दान, गहाण, लिज, पोटगी, टाच, बोझा वारसाहक्क, वहीवाटीचे हक्क, इ. असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून 03 (तीन) दिवसांचे आत लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी हरकत वर नमूद पत्यावर नोंदवावी आणि तशी आमचे अशिलांना खात्री करुन दयावी. मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत व तक्रार न आल्यास आमचे अशिल वर नमूद मिळकतीचे खरेदीचे व्यवहार पूर्ण करतील मग तद्नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत अथवा तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून सदरची खरेदीपूर्व जाहिर नोटीस प्रसिध्द केलेली आहे. ही जाहीर नोटीस दिली. ता. 12/08/2023

सही/-
एस. एम. पिरजादे
ॲडव्होकेट्स
Shop No.1, Beskar Building,
Basememnt of B.M.C. Bank, Civil
Chowk, Near Dist. Court, Solapur



## लोकमंगल पतसंस्थेच्यावतीने गंगखोरी प्राथमिक शाळेत वृक्षारोपण

मोडनिंब : लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था शाखा मोडनिंब यांच्यावतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गंगखोरी मोडनिंब येथे वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला व शालेय विद्यार्थ्यांना खाऊ वाटप केला. यावेळी कार्यक्रमास शाळेचे व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विक्रम माने सर, मुख्याध्यापक महेंद्र कोळी गुरुजी,अंकुश जाधव सर,नवनाथ शिंदे गुरुजी,क्रुषी पर्यवेक्षक संतोष सुर्वे,जाडकर साहेब तसेच ईतर शिक्षक,पालक,खातेदार तसेच शाखेचे सल्लागार तानाजी इंगळे(सर) व शाखाधिकारी समाधान वसेकर व लोकमंगल पतसंस्था मोडनिंब चा सर्व स्टाफ उपस्थित होता. स्वागत महेंद्र कोळी यांनी केले तर आभार समाधान वसेकर यांनी मानले.



## महिला शाखेच्या वतीने स्मिता देशपांडे यांचा सत्कार

सोलापूर : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था महिला शाखेच्या सहकार्यवाह सौ.स्मितताई आनंद देशपांडे यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठा कडून योग शिक्षक पदविका प्रथम श्रेणी मध्ये प्राप्त झाली. या मध्ये योगाभ्यासा बरोबरच वेद उपनिषदे,प्रॅक्टिकल,योग,२ पेपर,अशा अनेक गोष्टी ४०० मार्क्स साठी परीक्षेस होत्या, या सर्व परीक्षेत त्यांनी प्राविण्य मिळविले त्याबद्दल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था महिला शाखेच्या वतीने संस्था कार्यालयात महिला शाखेच्या अध्यक्षा कु.हेमाताई चिंचोळकर त्यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करुन त्याना त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.यावेळी डॉ.नभा काकडे, प्रा.मधुरा वडापुरकर, क्षितिजा गाताडे, प्रा.शुभदा देशपांडे, प्रा.शुभदा कुलकर्णी आदि संस्थेच्या पदाधिकारी व सदस्य उपस्थित होत्या.



## स्वातंत्र्यदिनानिमित्त कुरूलमधील ९ शाळांमध्ये विविध स्पर्धा

विरवडे(बु) : भारतीय स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून मोहोळ तालुक्यातील कुरुल व परिसरातील ९ जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये कुरुलच्या ग्रामपंचायत सदस्या मोहिनी घोडके यांच्यावतीने विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी विविध स्पर्धा आयोजित केल्या होत्या. परिसरातील ९ जिल्हा परिषद शाळांमध्ये वक्तृत्व स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा व चित्रकला स्पर्धा या स्पर्धा राबविण्याचे आयोजन करण्याची घोडके यांनी संकल्पना मांडली. या संकल्पनेला सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांनी समंती दर्शविली. यामधून प्रत्येक स्पर्धेमध्ये प्रत्येक इयत्तेमधून ३ क्रमांक निवडले जाणार आहेत. यासाठी प्रथम ट्रॉफी व प्रशस्तीपत्र, द्वितीय क्रमांक मेडल व प्रशस्तीपत्र आणि तृतीय क्रमांक शालेय साहित्य व प्रशस्तीपत्र असे देण्यात येणार असून या बक्षिसांचे वितरण १५ ऑगस्ट रोजी ध्वजारोहण कार्यक्रम झाल्यानंतर ज्या त्या शाळांमध्ये केले जाणार असल्याची माहिती घोडके यांनी दिली.

## जागतिक अवयवदान दिनानिमित्त सोलापुरात महारॅली

सोलापूर : जागतिक अवयवदान दिनानिमित्त सोमवार दि.१४ ऑगस्ट २०२३ रोजी सकाळी ८.३० वाजता महारॅली काढण्यात येणार आहे,अशी माहिती श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांनी पत्रकार परिषदेत दिली. अवयवदानाची माहिती सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे. या उद्देशाने दि. १३ ऑगस्ट २०२३ हा जागतिक अवयवदान दिन म्हणून साजरा केला जातो. या जागतिक अवयवदान दिनानिमित्त पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ, डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय य श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर, अश्विनी ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, कुंभारी, अश्विनी सहकारी रुग्णालय आणि संशोधन केंद्र नियमित, सोलापूर, असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा संयुक्त विद्यमाने सोमवार दि.१४ ऑगस्ट २०२३ रोजी शहरातील महाविद्यालयीन विद्यार्थी, विद्यार्थीनी यांची अवयवदान दिनानिमित्त महारॅली काढण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलीस आयुक्त राजेंद्र माने, सोलापूर विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु आर.के. कामत, महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले, पोलीस अधिक्षक शिरीष सरदेशपांडे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत महारॅलीचे उद्घाटन करण्यात येणार आहे.

## महिलेवर सत्तूरने वार

सोलापूर : मंगळवार बाझार येथे मासे विक्री करण्याच्या बसण्याच्या ठिकाणावरून महिलेवर सत्तूरने वार केल्याने महिला जखमी झाली आहे. या प्रकरणी शेखर अर्जुन जगताप ( वय ३४, रा. कौतम चौक) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरून तिघांवर गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी जगताप हे मंगळवारी दुपारी मासे विक्री करण्यासाठी मंगळवार बाजारातील नेहमीच्या ठिकाणी गेल्या असता तेथे आरोपी रेखा बादल गायकवाड ही तेथे मासे विक्रीकरिता बसली होती. तेव्हा फिर्यादी तेथे गेल्यानंतर आरोपीने फिर्यादीला वाद घालण्यास सुरूवात केली. यावेळी तिला समजावून सांगताना फिर्यादीचे मासे रस्त्यावर टाकले. शिवाय आरोपीने फिर्यादीवर सत्तुरने वार केले. तर आरोपी बादल गायकवाड व त्यांची मुलगी यांनी फिर्यादीच्या आईला मारहाण करून जखमी केले. या प्रकरणी वरील तिघांवर गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा तपास पैकेकरी करत आहेत.




## पत्रकारास मारहाणीचा निषेध, आरोपीवर कारवाईची मागणी

**टेंभुर्णी** : पाचोरा येथील पत्रकार संदीप महाजन यांना मारहाण करणाऱ्या गावगुंडावर पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात यावा. या मागणीसाठी शनिवार दिनांक १२ रोजी टेंभुर्णी येथे पत्रकारांच्या वतीने पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांना निवेदन देण्यात आले. जळगाव जिल्ह्यातील पाचोरा येथील पत्रकार संदीप महाजन यांना आमदार किशोर पाटील समर्थक असलेल्या गाव गुंडांनी मारहाण केली.यात आरोपींना जामीनही मिळाला आहे. महाजन यांना केलेल्या मारहाणीची कार्यवाही ही पत्रकार संरक्षण कायद्यानुसारच करण्यात यावी अशी मागणीसाठी टेंभुर्णी शहर व परिसरातील पत्रकारांनी टेंभुर्णी पोलिसांकडे केली आहे. यावेळी जेष्ठ पत्रकार मुकुंद रामदासी, संतोष वाघमारे , टेंभुर्णी-शहर ग्रामीण पत्रकार संघटनेचे अध्यक्ष सिद्धेश्वर शिंदे, सचिव गणेश पोळ, गणेश स्वामी, सतीश होदाडे, सज्जन शिंदे, विनायक जोशी,दीपक देशपांडे, सुहास कांबळे प्रा. हरिश्चंद्र गाडेकर, धनंजय भोसले, प्रदीप पाटील विकास श्रीखंडे, राजेंद्र दडस, पिंटू सुरवसे, सचिन जगताप, सोमनाथ निर्धार आदी उपस्थित होते.



## वाघोली जि.प. शाळेतील विद्यार्थ्यांनी साकारले चांद्रयान

**माळीनगर** : माळशिरस तालुक्यातील वाघोली येथील जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी चांद्रयान ३ ची प्रतिकृती करून शिक्षणाबरोबर आपल्या अंगातील कलागुणांना वाव दिला आहे.चांद्रयानची ३ ची प्रतिकृती केलेल्या विद्यार्थ्यांच्या चहेऱ्यावर वेगळाच आनंद दिसत होता. वाघोली येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षणाबरोबर त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव देण्याचे काम करत असते. ही शाळा नेहमीच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला महत्त्व देऊन विविध उपक्रम राबविण्यात अग्रेसर असते. इस्रोमार्फत पाठवलेल्या चंद्रयान ३ ची उत्सुकता चिमुकल्यांमध्ये पाहायला मिळाली.त्यांनी स्वतःच्या कल्पकतेने चंद्रयान बनविले आहेत.रविराज मिसाळ, शिवतेज मिसाळ,देवराज जाधव,स्नेहल मिसाळ,शोएब बागवान,सिद्धी मिसाळ,माधुरी यादव,अथर्व गाडे, गौरी पवार,सार्थक केंगार,यश पाटोळे,प्राची मिसाळ इत्यादी तसेच इयत्ता सहावी सातवीतील अनेक विद्यार्थ्यांनी चंद्रयान बनवले आहेत. या विद्यार्थ्यांना चंद्रयान बनवण्यासंदर्भात विविध कल्पना व मार्गदर्शन दिगंबर मिसाळ तसेच शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र मिसाळ व सर्व शिक्षकांनी केले.



## सांगोला महाविद्यालयामध्ये ग्रंथपाल दिन साजरा

**सांगोला** : सांगोला महाविद्यालयामध्ये ग्रंथपाल दिन ' साजरा करण्यात आला. सुरूवातीला महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य, डॉ. सुरेश भोसले यांच्या हस्ते डॉ.एस.आर.रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा.नरेंद्र पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाप्रसंगी डॉ. अर्जुन मासाळ, डॉ. बबन गायकवाड, डॉ. आर.आर.ताठे, डॉ.पी.एस.पाटील, डॉ. अमोल पवार, अधिक्षक श्री. पी.एस.शिंदे, श्री.अवूधत कुलकर्णी व श्री.शंकर माने यांचेसह व इतर प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## सोमदत्त शेंडे याची योगासन स्पर्धेत जिल्हास्तर निवड



**नातेपुते** : नुकत्याच मोरोची येथील मोरजाई विद्यालय येथे जिल्हा परिषद व सोलापूर क्रीडा कार्यालय यांच्या वतीने शालेय तालुकास्तरीय योगासनाच्या स्पर्धा पार पडल्या. स्पर्धेमध्ये नातेपुते येथील शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालयातील इयत्ता ११वी सायन्स मधील विद्यार्थी सोमदत्त शेंडे यानी १९ वर्ष वयोगटात उत्कृष्ट कामगिरी करून प्रथम क्रमांक मिळविला. त्याची जिल्हास्तरीय योगासन स्पर्धेसाठी निवड झाली. त्याचे संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा पद्मजादेवी मोहिते पाटील, सोलापूर जिल्हा काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष डॉ. धवलसिंह मोहिते पाटील, संचालक उर्वशीराजे मोहिते पाटील, डॉ. चंद्रकांत कोळेकर महाविद्यालयातील शिक्षक यांनी अभिनंदन केले त्याला क्रीडाशिक्षक प्राध्यापक नारायण माने यांचे मार्गदर्शन मिळाले.

# उजनी ७० टक्के भरल्याशिवाय शेतीला पाणी नाही

## मागच्या वर्षी ऑगस्टमध्ये १०१ टक्के भरलेले धरण १३ टक्क्यांवरच स्थिरावले

सुराज्य/सोलापूर

**जिल्ह्याचे वरदायिनी असणाऱ्या उजनी धरणात दौंड वरून येणारा विसर्ग पूर्णत: बंद झाला असून मागील वर्षी १२ ऑगस्ट रोजी उजनी १०१ टक्के भरले होते. तर १५ ऑगस्टपासून ४० ते ४५ हजार क्युसेकचा विसर्ग खाली सोडावा लागला होता. पण, यंदा पावसाळा सुरु होऊन दोन महिने संपले, तरीदेखील धरण १३ टक्क्यांवरच स्थिरावले असल्याने मोठ्या पावसाच्या प्रतिक्षेत असलेल्या आणि उजनी धरणावर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.आगामी काळात पाऊस न झाल्यास शेतकऱ्यांचे अर्थकारण कोलमडून पडणार आहे.**



जिल्ह्यात यंदा १५ जून ते ८ जुलै या काळात सरासरीच्या तुलनेत २० टक्के सुद्धा पाऊस झाला नाही. त्यानंतर पावसाला सुरवात झाली, पण अद्याप उजनीला मोठ्या पावसाची प्रतीक्षाच आहे. आता पुन्हा पावसाचा खंड पडीला असून उजनी धरण १३ टक्क्यावर स्थिरावले आहे. खडकवासला, कळमोडी, वडीवळे ही धरणे हाऊसफुल्ल भरल्यावर दौंडवरून उजनीत येणारा विसर्ग मोठा असतो.

पण, ही धरणे पूर्ण क्षमतेने भरत असतानाच पाऊस कमी झाला आणि उजनीतील विसर्ग देखील कमी झाला. सोलापूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या औज बंधाऱ्यात चार मीटर पाणी आहे.परंतु आणखी १५ ते २० दिवस पाऊस न झाल्यास शहरासाठी पाणी सोडावे लागू शकते. त्यामुळे शेतीसाठी तुर्तास पाणी सोडले जाणार नाही, असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

### धरण ७० टक्के झाल्याशिवाय शेतीला पाणी नाहीच

जून ते ऑगस्ट या काळात धरण क्षेत्रात खूपच कमी पाऊस झाला आहे. खडकवासला, भीमाशंकर धरण साखळी क्षेत्रात पाऊस झाल्याने उजनी धरण उणे साठ्यातून बाहेर पडले आहे. ऑगस्टमध्ये पावसाने ओढ दिली असून अजून पावसाचा काहीच अंदाज लागत नाही. त्यामुळे आता धरणातील पाणीसाठा ६० ते ७० टक्क्यांपर्यंत येत नाहीत, तो पर्यंत शेतीसाठी पाणी सोडले जाणार नाही, असे लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांचे नियोजन आहे. कारण, पाऊस कमी झाल्यास पुढच्या वर्षी उन्हाळ्यात तीव्र टंचाई निर्माण होऊ शकते.

## अरण येथे २१ रोजी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

सुराज्य/अरण

श्रीक्षेत्र अरणचे येथील हरिभाऊ नाना शिंदे यांच्या पुण्यस्मरणानिमित्त राज्यस्तरीय खुल्या व शालेय वक्तृत्व स्पर्धा सोमवार दिनांक २१ ऑगस्ट रोजी अरण (ता. माढा) येथील संत सावता माळी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आयोजित करण्यात आल्या आहेत. या स्पर्धा

शालेय गट १ली ते १० वी गटासाठी ५मिनिटे वेळ आहे तर खुला गट ११वी पासून पुढे आहे. वेळ ७ मिनिटे आहे. या स्पर्धेसाठी स्पर्धकांना विषयाचे बंधन नाही. सर्व सहभागी स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र मिळणार आहे.

स्पर्धेच्या ठिकाणी सकाळी ११ वाजेपर्यंतच नाव नोंदणी केली जाईल खुल्या गटासाठी प्रथम बक्षीस ३५०० रू., द्वितीय क्रमांकासाठी २५०० रू. तर तृतीय बक्षीस १५०० रूपये आहे. उत्तेजनार्थ ३ क्रमांक प्रत्येकी ५०० रुपये आहे.

शालेय गटासाठी प्रथम क्रमांक १५०० रू., द्वितीय क्रमांकासाठी १००० रू. तृतीय क्रमांकासाठी ७ ०० रू. ट्रॉफी उत्तेजनार्थ ३ क्रमांक प्रत्येकी ५०० रुपये दिले जाणार आहे. या स्पर्धा संत सावता माळी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय अरण येथे होणार आहेत. अधिक माहितीसाठी प्रा.सुरेश मोरे सर व स्पर्धा प्रमुख सतीश घाडगे यांच्या कडे संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## वेळापुरात डॉ. रंगनाथन यांची जयंती साजरी

सुराज्य/वेळापूर



इंग्लिश स्कूल वेळापूर येथे शनिवार रोजी भारतीय ग्रंथालय चळवळीचे जनक पद्मश्री डॉ. एस.आर. रंगनाथन यांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधून इंग्लिश स्कूल, वेळापूर या प्रशालेत संस्थेच्या संचालिका प्रा. सौ. तेजस्विनी कदम मॅडम यांच्या संकल्पनेतुन त्यांचा जन्मदिवस प्रशालेत विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

यावेळी प्रथम डॉ. रंगनाथान व दलीतमित्र कदम गुरुजी यांच्या प्रतिमेला प्रशालेचे प्राचार्य. पवार आर बी. यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी प्रशालेचे पर्यवेक्षक शिवशरण पठान.व प्रशालेचे ग्रंथपाल नवगीरे एस.के. उपस्थित होते.त्यानंतर प्रशालेचे पर्यवेक्षक शिवशरण पठान यांनी डॉ. एस.आर. रंगनाथन यांच्या जीवन चरित्रावर मनोगत व्यक्त केले. यावेळी शालेय विद्यार्थ्यांसाठी पुस्तकांचे ग्रंथ प्रदर्शन भरविण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सतीश कदम यांनी केले.

## मिटकलवाडी येथे मेगा स्वीट पीक पाणी कार्यक्रम

सुराज्य/टेंभुर्णी

टेंभूर्णी माढा तालुक्यातील मिटकलवाडी येथे सभापती विक्रम शिंदे यांच्या उपस्थितीत नयन सुरवसे यांचा शेतात गोड ज्वारी वर्गातील चारा पीक वाण मेगास्वीट पीक पाहणी कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमात डवांटा कंपनीचे डी.जी.एम पांडुरंग पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली चेतन जाधव यांनी कंपनीच्या विविध प्रकारचा संशोधित नवीन तंत्रज्ञानाने विकसीत हायब्रीड चारा पिके याबद्दल सविस्तर माहिती दिली.

चाऱ्यातील क्रांती घडवून आणणाऱ्या मेगस्वीट या वाणाची जास्तीत जास्त पशुपालकांनी लागवड करावी असे आवाहन केले. आव्हाहन प्रमुख पाहुण्यांनी केले. कार्यक्रमास सरपंच संतोष सुरवसे, उपसरपंच रवींद्र श्रीखंडे, राष्ट्रवादी उपजिल्हाध्यक्ष नवनाथ सुरवसे, सर्जेराव सुरवसे, गणपत सुरवसे, रामलिंग सुरवसे, बाळासाहेब सुरवसे अध्यक्ष, अरुण सुरवसे, मा सरपंच मोहन आप्पा लोकरे, तंटामुक्ती अध्यक्ष माणिक आबा मिटकल, विकास सेवा सोसायटी चेअरमन संजय मामा मिटकल,पत्रकार सिद्धेश्वर शिंदे, पैलवान अधिकराव हुंबे ,मिटकलवाडी माळेगाव ,बेंबळे ,हरी नगर, संगम, येथून मोठ्या संख्येनेशेतकरी उपस्थित होते.

## आ. सातपुते यांच्या फोनद्वारे विद्यार्थी, प्रवाशांचा प्रश्न सुटला



सुराज्य/पिलीव

आ. राम सातपुते यांच्या एका फोनद्वारे पिलीव येथील विद्यार्थी, प्रवाशयांचा प्रश्न सुटला. पिलीव येथे अनेक एस.टी. बस थांबत नव्हत्या. आ. सातपुते यांनी थेट सोलापूर जिल्हा आगारप्रमुखांना फोनद्वारे येथे बस थांबवण्याचे आदेश दिले.

आमदार रामभाऊ सातपुते हे पिलीव येथे एका कार्यक्रमासाठी आले असता पत्रकारांशी त्यांनी विविध अडचणी संदर्भात चर्चा केली. यामध्ये पिलीव बसस्थानकावर अनेक एस टी बसेस थांबविण्यात येत नाहीत यामुळे भाळवणी, पंढरपूर , अकलुज येथे जाणाऱ्या विद्यार्थी व प्रवाशांची प्रचंड गैरसोय होत आहे, याविषयी महाराष्ट्र राज्य पत्रकार सुरक्षा समितीचे तालुका अध्यक्ष सुजित सातपुते यांनी आमदार रामभाऊ सातपुते यांना सांगितले. पत्रकार दामोदर लोखंडे, संजय पाटील, प्रमोद भैस, शाहरुख मुलाणी, गणेश देशमुख यांनी त्यांना सह्यांचे निवेदन दिले. आमदार रामभाऊ सातपुते यांनी पत्रकारांच्या मागणीची ताबडतोब दखल घेत सोलापूर जिल्ह्याचे आगारप्रमुख यांना पिलीव येथे अधिकृत थांबा असुनही याठिकाणी एसटी बसेस थांबविण्यात येत नाहीत. चालक व वाहक यांच्या हलगर्जीपणामुळे माझ्या मतदारसंघातील विद्यार्थी व प्रवाशयांची गैरसोय होत आहे, असे ठणकावत येथे बस थांबवण्याचे आदेश दिले. याची दखल घेत सर्व एसटी बसेस याठीकाणी थांबविण्यात येऊ लागल्या आहेत.

## अकलूजमध्ये उभे राहणार डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन

### ८३ लाखांच्या निधीची फडणवीस यांच्याकडे मागणी

सुराज्य/सोलापूर





भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनमोल कार्याची प्रेरणा सातत्याने मिळत रहावी यासाठी अकलूज परिसरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन उभारण्याची मागणी आ.रणजितसिंह मोहिते-पाटील राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली असून सदर मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत सुमारे ८३ लाख रूपये उपलब्ध करण्याबाबतच्या सूचना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबंधित विभागाला दिल्या आहेत.

सुमारे ७० हजार लोकसंख्या असलेल्या अकलूज नगरपरिषद हद्दीतील गावात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या साहित्यांचा अभ्यास करण्याकरिता वाचनालय अथवा आंबेडकर भवन नाही. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या आयुष्याच्या ६५ वर्षात सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक, साहित्यीक, औद्योगिक, घटनात्मक इत्यादी क्षेत्रात असंख्य कामे करून राष्ट्र उभारणीत महत्वपूर्ण योगदान दिले आहे त्याची प्रेरणा नागरिकांना सतत मिळणे आवश्यक आहे यासाठी अकलूज नगरपरिषद हद्दीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भवन बांधण्यात यावे व त्याठिकाणी सुसज्ज वाचनालय व्हावे अशी मागणी आ.रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी केली आहे. मागणीला सकारात्मक प्रतिसाद देऊन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सामाजिक न्याय विभागाच्या प्रधान सचिवांना तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या असल्याने अकलूज परिसरातील नागरीकांतून समाधान व्यक्त होत असतानाच आ.रणजितसिंह मोहिते-पाटील यांचे आभार व्यक्त करण्यात येत आहेत.

## यासाचे कार्य निश्चितच प्रशंसनीय : अनास्कर

सुराज्य/अक्कलकोट

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली सुरु असलेले न्यासाचे कार्य निश्चितच प्रशंसनीय आहे, शिखर तथा महाराष्ट्र राज्य शहकरी बँकेचे प्रशासक व विद्या सहकारी बँक लि. पुणेचे अध्यक्ष विद्याधर अनास्कर यांनी व्यक्त केले.

अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात सहकुटुंब आले असता अनास्कर बोलत होते. न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्या समवेत पत्नी लिना अनास्कर, किरण कुलकर्णी, पूजा कुलकर्णी, सिमा बंगाळे, प्रकाश पाटील, निखील रणदिवे हे उपस्थित होते. याप्रसंगी यांचा देखील न्यासाच्य वतीने सत्कार करण्यात आला.

अर्थतज्ञ विद्याधर अनास्कर यांच्या वाढदिवसानिमित्त श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले, न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले व अन्नछत्र परिवाराच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, पुरोहित अप्पू पुजारी, सिद्धाराम कल्याणी, एस.के.स्वामी, बाळासाहेब पोळ, सतीश महिंद्रकर, बाळासाहेब घाडगे, नामा भोसले, दत्ता माने, प्रसाद हुल्ले, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, आदी परस्थित होते.

# गौडगाव जागृत मारुती मंदिरात भाविकांची गर्दी

### पाटील कुटुंबाकडून महाप्रसाद वाटप

सुराज्य/अक्कलकोट





अधिक मास महिन्याच्या शनिवारी गौडगाव येथील जागृत मारुती मंदिरात भाविक,भक्तांनी मारुतीच्या दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती.या मास महिन्यात,मारुतीच्या नावाने अन्नदान केल्यास पुण्य प्राप्त होत असते, अशी भाविकांची श्रद्धा आहे.मारुती भक्त बसवराज पाटील व कुटुंबीयांकडून श्री जागृत मारुती अन्नछत्र मंडळात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आला होता. यावेळी हजारो भाविक भक्तांनी महाप्रसादाने तृप्त झाले.

गौडगावच्या पुरातन हेमांडपंती जागृत मारूती मंदिरात मारूतीचा मंत्रोचारात अभिषेक, होमहवन, शनिपुजा,महाआरती विविध पूजा भक्ताच्या साक्षीने पार पडला. भाविक संतोष मनोहर पतंगे यांना दुपारच्या महाआरतीच्या मान मिळाला, या पूजेसाठी मोठ्या संख्येने भाविकांनी गर्दी केली होती.गौडगांव अन्नछत्र मंडळात मारूतीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविक भक्तांना महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.दक्षिणमुखी जागृत मारूतीच्या दर्शनासाठी महाराष्ट्र, कर्नाटक व इतर राज्यातून आलेले हजारो भाविकांनी महाप्रसाद घेण्यासाठी पहाटे पासून मंदिरात अलोट गर्दी केली होती.राज्य परराज्यातून आलेल्या भाविक भक्तांचे रिग दिवसभर पाहायला मिळाला.यावेळी अध्यक्ष श्रीकांत खानापुरे, उपाध्यक्ष सिद्राम वाघमोडे,सचिव प्रकाश म्हेर्थे,ज्ञानेश्वर फुलारे,शांतय्या स्वामी,बिरप्पा पुजारी आदी विश्वस्तांनी परिश्रम घेतले.

### उत्तम सुविधा देण्याचा प्रयत्नः वाघमोडे

अक्कलकोट तालुक्यातील गौडगांव येथील जागृत मारुती मंदिरात दर्शनार्थींची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे.पहाटेपासून ते सायंकाळी,रात्री उशिरापर्यंत पोटभर महाप्रसाद दिला जातो. या सुविधेमुळे भाविक समाधान व्यक्त करित आहे.श्री जागृत मारुती देवस्थानाकडून भाविकांना उत्तम सुविधा देण्याचा आमचा प्रयत्न असल्याचे जागृत मारुती अन्नछत्र मंडळाचे उपाध्यक्ष सिद्राम वाघमोडे यांनी सांगितले.

### अन्नदान केल्याने सुख मिळतेः पाटील

दर तीन वर्षांनी येणाऱ्या अधिक मास महिन्यात मारुती मंदिरात दानधर्म केल्याने पुण्य प्राप्त होत असते, अशी श्रद्धा आहे.यानिमित्ताने गौडगाव येथील श्री जागृत मारुतीच्या अन्नछत्र मंडळात महाप्रसादाच्या स्वरूपात अन्नदान केला आहे.अन्नदान केल्याने मनाला सुख, समाधान,शांती मिळते, असे भक्त बसवराज पाटील यांनी सांगितले.



## वेळापूर शेरी १० फाटा ते शेरी रस्त्याचे भूमिपूजन

सुराज्य/वेळापूर

वेळापूर शेरी येथील १० फाटा ते शेरी रस्ता या ३ किलोमीटर मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेचे भूमिपूजन आमदार रणजीतसिंह मोहिते पाटील, आमदार राम सातपुते, माळशिरस पंचायत समितीचे माजी उपसभापती अर्जुनसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाला शहाजी माने देशमुख, बबन शिंदे, रावसाहेब माने देशमुख, विक्रमसिंह माने देशमुख, सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन शंकरराव माने देशमुख, भाजपा तालुका उपाध्यक्ष अमरसिंह माने देशमुख, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे माढा लोकसभा अध्यक्ष कमलाकरतात्या माने देशमुख, मार्केट कमिटीचे संचालक नितीन सावंत ,महादेव देवालय ट्रस्टचे अध्यक्ष अमृतराज माने देशमुख, पिसेवाडी माजी सरपंच सुरेश पिसे, माजी सरपंच अण्णासाहेब शेंडे, ग्रामपंचायत सदस्य अमृतराव माने देशमुख, दीपकआबा राऊत, दीपक चव्हाण, प्रकाशराव माने देशमुख, गणपत आडत, विराज माने देशमुख, भाऊसाहेब साठे, रामचंद्र अडसूळ, धनंजय माने देशमुख, दीपक माने देशमुख, तानाजी माने देशमुख, सतीश खराडे, अरुण चांडोले, पोपट कदम, शरद साळुंखे, राहुल माने देशमुख, हिम्मत माने देशमुख, स्वप्निल माने देशमुख, सुधीर माने देशमुख, धैर्यशील माने देशमुख, अमरसिंह माने देशमुख, राजू आडत यासह वेळापूर परिसरातील भाजपाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# राज्यात तिसरी ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या तीन मूल्यांकन चाचण्या

## १७ ते १९ ऑगस्टदरम्यान पायाभूत चाचणी

**सुराज्य/मुंबई**



स्टार्स प्रकल्पाअंतर्गत नियतकालिक मूल्यांकन चाचणी अंतर्गत पायाभूत चाचणी आणि दोन संकलित मूल्यमापन चाचण्या अशा तीन चाचण्यांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार राज्यातील तिसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांची पायाभूत चाचणी १७ ते १९ ऑगस्टदरम्यान, तर अन्य चाचण्या ऑक्टोबर आणि एप्रिलमध्ये होणार असल्याचे विद्या प्राधिकरणाने जाहीर केले. शासकिय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांतील तिसरी ते आठवीच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात तीन शैक्षणिक प्रगती चाचण्या घेतल्या जाणार आहेत. या चाचण्या मागील इयत्तेचा अभ्यासक्रम, मूलभूत क्षमता यावर चाचणी आधारित असतील.

पायाभूत चाचणीमध्ये तिसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांची १७ ऑगस्टला भाषा विषय, १८ ऑगस्टला गणित आणि १९ ऑगस्टला इंग्रजी विषयाची लेखी परीक्षा घेतली जाणार आहे. पहिली संकलित मूल्यमापन चाचणी ऑक्टोबरच्या शेवटच्या किंवा नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात, दुसरी संकलित चाचणी एप्रिलच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात घेण्याचे नियोजन आहे.

राज्यभरातील शाळांना पायाभूत चाचणीच्या प्रश्नपत्रिकांसोबत शिक्षक सूचनापत्र, विषयनिहाय, शाळानिहाय आणि इयत्तानिहाय उत्तरसूची पुरवण्यात येईल. प्रश्नपत्रिका फाटणार किंवा भिजणार नाहीत याची दक्षता घेणे गरजेचे आहे. संबंधित चाचण्या दहावी-बारावी परीक्षेप्रमाणे नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांना अतिरिक्त ताण देऊ नये असे विद्या प्राधिकरणाचे प्रभारी संचालक कृष्णकुमार पाटील यांनी स्पष्ट केले आहे.

# पुण्यातील तरुणीचे ८ लाख लुटले

## पीएसआयसह पाच जणांवर गुन्हा दाखल

**सुराज्य/मुंबई**

**शेअर ट्रेडिंग करणाऱ्या पुण्यातील एका तरुणीची आठ लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी आरसीएफ पोलीस ठाण्यातील उपनिरीक्षक रवींद्र गायकवाड यांच्यासह चार ते पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुंतवणूक करण्यासाठी ही तरुणी पैसे घेऊन मुंबईत आली असताना गायकवाड यांनी तिच्यासोबत असलेल्या व्यक्तीला आरोपी म्हणून ताब्यात घेत तिच्याकडील पैसे काढून घेतल्याचा आरोप आहे.**



पिंपरी चिंचवडमध्ये शेअर ट्रेडिंगबाबत आयोजित एका सेमिनारमध्ये पुण्याच्या तरुणीची मोहसीन नावाच्या मुंबईतील तरुणासोबत ओळख झाली. एकाच क्षेत्रात असल्याने दोघे एकमेकांच्या संपर्कात होते. मोहसीन याने तिला गुंतवणुकीच्या आणखी चांगल्या योजना सांगितल्या. त्यानुसार दहा लाख रोख दिल्यास पुढील पंधरा दिवसांत दुप्पट रक्कम बँक खात्यामध्ये जमा होईल, असे त्याने सांगितले. त्यानुसार या तरुणीने गुंतवणूकदार शोधला. त्याने दहा लाखांची रक्कम तरुणीकडे दिली. ही रक्कम घेऊन ही तरुणी मुंबईत आली.

मोहसीन याने फ्री वे संपल्यानंतर तिला भेटण्यास सांगितले. तिथून काळाघोडा आणि पुन्हा मानखुर्दच्या दिशेने या तरुणीच्या कारमधून मोहसीन निघाला. चेंबूर येथे एक रिक्षा त्याच्या कारजवळ थांबली आणि त्यातून एक पोलीस अधिकारी उतरला. त्याने एका पोलीस कॉन्स्टेबलला बोलावून मोहसीन याला ताब्यात घेतले आणि आठ लाख रुपये काढून घेतले.

मोहसीन हा एका गुन्ह्यातील फरार आरोपी असल्याचे या तरुणीला सांगण्यात आले. हे सर्व काही संशयास्पद वाटत असल्याने तिने आरसीएफ पोलीस ठाण्याबाहेर पाळत ठेवली. तेव्हा यामध्ये उपनिरीक्षक रवींद्र गायकवाड यांचा सहभाग दिसला.

मोहसीन पोलिसांसोबत बाहेर पडल्यावर तिने शिवडीपर्यंत त्यांचा पाठलाग केला आणि अखेर पोलिसांत जाऊन सर्व हकीकत सांगितली. गायकवाड, मोहसीन आणि त्याच्या इतर साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# निवासी डॉक्टरांवरील ताणतणावाची अखेर दखल

## तक्रार निवारण पेट्या, हेल्पलाइन सुरू करणार

**सुराज्य/मुंबई**

केईएम रुग्णालयामध्ये निवासी डॉक्टरने आत्महत्या केल्याचे प्रकरण पुढे आल्यानंतर 'मार्ड' या डॉक्टरांच्या संघटनेने डॉक्टरांवरील ताणतणावाकडे लक्ष वेधले. निवासी विद्यार्थी डॉक्टरांना विनाकारण जर त्रास दिला जात असेल, अपमानास्पद शब्द वापरल्यास वा शाब्दिक अवहेलना केल्याची तक्रार आल्यास संबंधितांवर चौकशी करून कारवाई करण्याचा निर्णय महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त डॉ. सुधाकर शिंदे यांनी घेतला आहे. त्यासाठी तक्रार निवारण पेटी, तसेच हेल्पलाइन सुरू करून त्यांना दिलासा देण्याची तयारी दाखवण्यात आली आहे.

आपत्कालीन वैद्यकीय विभाग, शस्त्रक्रिया विभागांमध्ये येणाऱ्या रुग्णांची संख्या अधिक असते. काहीवेळा वरिष्ठ वैद्यकीय तज्ज्ञांवर हा भार आला की त्याचा राग निवासी डॉक्टरांवर काढला जातो. कोणत्याही व्यवस्थेमध्ये नियोजनाचे महत्त्व अधिक असते. वैद्यकीय शाखेमध्ये या प्रकारचा ताणतणाव सहन करावा लागतो असे कारणही दिले जाते. थिअरी प्रॅक्टिकल्सचे मार्क, वरिष्ठाचा रोष आणि शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी अनेक विद्यार्थी कोंडमारा सहन करत राहतात.

पालिका रुग्णालयांमध्ये रुग्णसेवेचा सर्वाधिक भार निवासी तरुण डॉक्टरांवर असतो. राज्याच्या कानाकोपऱ्यातून मुंबईत वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हे शहर नवीन असते. त्या समस्यांशी ते झगडत असतात. असे असताना येथील वातावरणाशी जुळवून घेण्यास वेळ लागतो. शिस्त हवी पण त्याचवेळी त्यांच्यावरचा ताण वाढणार नाही. त्यांच्या



वैयक्तिक तसेच सार्वजनिक आयुष्यासंदर्भातील उल्लेख करून त्यांना अपमानास्पद वाटणार नाही, हे प्राधान्याने पाहायला हवे, याची आवश्यकता व्यक्त केली जात आहे. काम करतो पण आदर द्या', सन्मानाने शिक्षण शक्य आहे', अशा मुद्द्यांच्या आधारे विद्यार्थी डॉक्टरांच्या समस्यांना वाचा फोडण्याचा प्रयत्न केला आहे.

# दादांच्या बांधकऱ्याला मोदींनी दिल्लीला बोलावले

**सुराज्य/मुंबई**



राष्ट्रीय दिनाचे औचित्य साधून सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय, कला क्रीडा, सांस्कृतिक आधी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवी दिल्ली येथे सत्कार करण्यात येतो. यंदाच्या ७६ व्या स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने बारामती तालुक्यातील ढेकळवाडी गावचे अल्पभूधारक शेतकरी अशोक सुदाम घुले यांना आणि यांच्या पत्नीचा सन्मान पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात मागील काही दिवसांपासून विविध बदल होत असल्याचे पाहायला मिळत आहे. या बदलत्या राजकारणाची चक्रेही विविध अंगाने फिरताना दिसत आहेत. केंद्रातील मोदी सरकारने पंतप्रधान शेतकरी सन्मान योजना सुरू केली. त्याच अनुषंगाने त्यांनी शेतकऱ्यांचा सन्मान करण्याकरता दिल्लीमध्ये विविध क्षेत्रातील नागरिकांना निमंत्रित करून त्यांचा योग्य तो सन्मान करण्याचे नियोजित केले. याच पार्श्वभूमीवर पुणे जिल्ह्यातील बारामती तालुक्यातील ढेकळवाडी गावचे शेतकरी अशोक सुदाम घुले यांना आणि त्यांच्या पत्नीला निमंत्रित केलंय. विशेष बाब म्हणजे पंतप्रधानांच्या हस्ते सन्मान होणारे अल्पभूधारक घुले दाम्पत्य हे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या काटेवाडी गावालगतचे शेतकरी आहेत.

## ▶▶ महत्त्वाचे वृत्त...

### आजपासून दिल्ली केंद्राच्या ताब्यात

**नवी दिल्ली :** संसदेच्या पावसाळी अधिवेशनाचा शुक्रवार शेवटचा दिवस होता. वादळी ठरलेल्या या पावसाळी अधिवेशात चर्चा रंगली होती ती, दिल्ली सेवा विधेयकाची आणि मोदी सरकारवरील अविश्वास प्रस्तावाची. हे दोन्ही प्रस्ताव केंद्र सरकारने जिंकले. याच दरम्यान याच अधिवेशनात डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन यासह दिल्ली सेवा विधेयक मंजूर झाले होते. या विधेकांना राष्ट्रपतींनी मंजुरी दिली असून, दोन्ही विधेयकांचे कायद्यात रुपांतर झाले आहे. त्यामुळे आता दिल्ली केंद्राच्या ताब्यात गेली असून, डेटा वापरावंर आणि गैरवापरावर आळा बसणार आहे. डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन बिल गेल्या आठवड्यातच संसदेत मंजूर झाले होते आणि आता त्याला राष्ट्रपतींचीही मंजुरी मिळाली आहे. राष्ट्रपतींच्या संमतीनंतर डीपीडीपी विधेयक आता कायदा बनले आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून ही माहिती दिली आहे.

### मृत पोलिसांच्या विधवांसाठी वेतन देणार


**मुंबई :** राज्यात नक्षलवादी, अतिरेकी कारवाई तसेच दरोडेखोरी, संघटित गुन्हेगारी विरोधी कारवाई आणि कर्तव्य बजावताना मृत आणि जखमी झालेल्या पोलिस अधिकारी/कर्मचाऱ्याच्या विधवा पत्नीला आता आर्थिक लाभ पुन्हा मिळणार आहेत. राज्य सरकारकडून पुनर्विवाह केल्यानंतर शहिदांच्या पत्नीचे वेतन बंद करण्यात आले होते. विधवांनी पुनर्विवाह केल्याने शहिदांच्या कुटुंबीयांची आर्थिक फरफट सुरु होती.

राज्य सरकारकडून पुनर्विवाह केला आहे, अशा विधवा पत्नीस कुटुंबीय या नात्याने दिवंगत अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवानिवृत्तीच्या तारखेपर्यंत वेतन देण्यासाठी मान्यता दिली आहे. त्यामुळे कर्तव्यावर असताना मृत झालेल्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या पुनर्विवाह केलेल्या विधवांना १३ ऑगस्ट २०१३ च्या निर्णयानुसार राज्य सरकारच्या निर्णयातील तरतुदींप्रमाणे संपूर्ण वेतनाचा लाभ अदा करण्यात येणार आहे. त्यामुळे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून पुनर्विवाह करणाऱ्या शहिदांच्या विधवांना दिलासा मिळाला आहे. पोलिसांच्या मृत्यूनंतर विधवा पत्नीला शासनाकडून वेतन दिले जाते. मात्र, पुनर्विवाह केल्यानंतर शहिदांच्या पत्नीचे वेतन बंद करण्यात आले होते. त्यामुळे राज्यातील अनेक शहिदांच्या पत्नी व कुटुंबीयांनी याबाबत तक्रार केली होती. त्यामुळे विधवांनी पुनर्विवाह केल्याने शहिदांच्या कुटुंबीयांची सुद्धा फरफट सुरु होती.

# नागपुरात लम्पीने पसरले पाय

## आतापर्यंत ३२ जनावरे दगावली, अद्यापही ३८७ उपचाराखाली

**सुराज्य/नागपूर**



गेल्या वर्षी संपूर्ण देशभरात हाहाकार माजविणाऱ्या गोवंशीय जनावरांमध्ये आढळणाऱ्या लम्पी या त्वचारोगाने पुन्हा एकदा जिल्ह्यात डोके वर काढले आहे. जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागाकडून प्राप्त आकडेवारीनुसार, सद्यस्थितीत या आजाराने जिल्ह्यातील दहावर तालुक्यांत पाय पसरले असून, ३८७ जनावरांवर उपचार सुरू आहेत. तर आजवर ३२ जनावरांचा मृत्यूही झाला आहे.

लम्पीचा प्रादुर्भाव नागपूर जिल्ह्यातील हिंगणा, पारशिवनी, सावनेर, काटोल, कळमेश्वर, नरखेड, कामठी आदी तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. यापूर्वी सप्टेंबर २०२२मध्ये देशभरासह महाराष्ट्रातही या आजाराने हाहाकार माजविला होता. त्यावेळी प्रशासनाकडून जिल्ह्यामध्ये असणाऱ्या गोशाळा, रस्त्यावरील मोकाट जनावरे यांच्येही लसीकरण करण्यात आले होते. त्यावेळी हा संसर्गजन्य आजार असल्याने जनावरांकरिताही टाळेबंदी करण्यात आली होती. लसीकरणावर भर देत या आजारावर नियंत्रण मिळविण्यात यश आले होते. लसीकरण न झालेल्या जनावरांच्या स्थलांतरणाला परवानगी नव्हती. त्यामुळे जनावरांच्या बाजारावरही प्रतिबंध घालण्यात आला होता. नंतर जनावरांच्या बाजारावरील प्रतिबंध हटवण्यात आले. आता पुन्हा एकदा या आजाराने डोके वर काढले आहे.

जि. प. च्या पशुसंवर्धन विभागाकडून प्राप्त आकडेवारीनुसार, आजवर लम्पी आजाराचा विळखा जिल्ह्यातील रामटेक तालुका वगळता उर्वरित सर्वच तालुक्यात झाला आहे. या आजारामुळे आजवर ३२ जनावरे दगावली आहेत. तर १२७४ जनावरांना या आजाराने आपल्या विळख्यात घेतले असून, त्यापैकी ८५५ जनावरे या आजारावर मात करून बरेही झाले आहेत. तर सद्यस्थितीत ३८७ जनावरांवर उपचार सुरू आहे.

# जन्मतारखांच्या घोळामुळे पेन्शन मिळेना

## पीएफ कार्यालयात चकरा मारण्याची सेवानिवृत्तांवर वेळ

**सुराज्य/छ. संभाजीनगर**

पीएफ सदस्य ज्या दिवशी निवृत्त होतील त्याच दिवशी त्याच्या हातात पेन्शन पेमेंट ऑर्डर (पीपीओ) प्राप्त व्हावे, यासाठी प्रयास उपक्रम राबविला जातो. एकीकडे हा कौतुकास्पद उपक्रम सुरू असतानाच दुसरीकडे मात्र जन्मतारखेचा घोळ झाल्याने काही सेवानिवृत्त कामगारांना हक्काच्या पेन्शनसाठी कार्यालयात चकरा मारण्याची वेळ आली आहे. आवश्यक त्या पुराव्यासह जन्म तारखेबाबत दुरुस्ती अर्ज दाखल केल्यानंतरही दाद मिळत नसल्याने पुढे काय करावे, असा सवाल त्या निवृत्त सभासदांनी एका खाजगी वृत्तवाहिनीशी बोलताना केला.

येथील भविष्य निर्वाह निधीच्या क्षेत्रीय कार्यालय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड आणि बीड या सहा जिल्ह्याचा समावेश आहे.



वेगवेगळ्या क्षेत्रातील कंत्राटदार, साखर कारखाने, कंपन्या, हॉटेल, शैक्षणिक संस्था, रुग्णालये, उद्योग असे विभागात (एम्प्लॉयर अथवा इस्टाब्लिशमेंट) नोंदणीकृत आस्थापनांची संख्या १९ हजारच्या घरात आहे. विभागात २५ लाख खातेदार आहेत, तर पेन्शनधारकांची संख्या ७२ हजाराच्या घरात आहे. विभागातील पेन्शनधारकांना दरमहा ११ कोटी ९१ लाख रुपये पेन्शनपोटी अदा केले जातात. पीएफ सदस्य ज्या दिवशी निवृत्त होतील त्याच दिवशी त्याच्या हातात पेन्शन पेमेंट ऑर्डर (पीपीओ) प्राप्त व्हावे, यासाठी विभागाने गेल्या दोन वर्षांपासून प्रयास उपक्रम सुरू केला. ३० पेक्षा अधिक सभासद कामगारांना त्यांचा लाभ झाला. या उपक्रमामुळे निवृत्त झालेल्या व पेन्शन लागू असलेल्या कर्मचाऱ्याला त्यांचे पहिले पेन्शन सुरू करण्यासाठी बँकेत, कंपनीत खेपा घालण्याची गरज राहिली नाही.

एकीकडे हा चांगला उपक्रम राबविला जात असतानाच दुसरीकडे पेन्शन लागू करा, यासाठी निवृत्त झालेल्या एका कामगारास गेल्या तीन वर्षांपासून पीएफ कार्यालयाच्या चकरा माराव्या लागत असल्याची धक्कादायक बाब समोर आली.

# कोल्हापुरात मोबाईल,टीव्ही २ तास बंद राहणार

**सुराज्य/कोल्हापूर**



सायंकाळी घरात टीव्हीवर मालिका सुरू असतात, आई त्या बघण्यात मग्न.. वडील मोबाइलवर बोलण्यात गुंग.. मुलांचे लक्ष थोडे टीव्हीकडे आणि संधी मिळताच मोबाइल खेळण्याकडे... घरातील या परिस्थितीमुळे अभ्यासाचे पार वाटोळे होत आहे... यांचा अनियंत्रित आणि अतिवापर विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत अडथळा ठरत आहे... ही परिस्थिती बदलण्यासाठी रोज दोन तास या दोन्ही गोष्टी बंद ठेवण्याचा अभिनव उपक्रम राबवण्याचा निर्णय कोल्हापूरचे माध्यमिक शिक्षणाधिकारी डॉ. एकनाथ आंबोकर यांनी घेतला आहे. मोबाइल टीव्ही बंद करू या, मुलांच्या प्रगतीच्या ध्यास धरू या,' या उपक्रमामुळे गुणवत्ता वाढीस निश्चितच मदत होण्याची शक्यता आहे.

जिल्ह्यातील माणगाव व तळसंदे या दोन गावांत रोज रात्री दोन तास मोबाइल व टीव्ही बंद ठेवण्यात येतात. यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासाला अतिशय पूरक वातावरण निर्मिती होत असल्याने या गावातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढली आहे. यामुळे या उपक्रमाचा आदर्श जिल्ह्यातील सर्वच गावांनी घ्यावा यासाठी जि. प. ने पुढाकार घेतला आहे. याचाच एक भाग म्हणून माध्यमिक शिक्षणाधिकारी आंबोकर यांनी जि. प. शाळा आणि शिक्षकांच्या मदतीने सर्व गावात हा उपक्रम राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

### सलग सुट्ट्यांमुळे पुणे-मुंबई एक्सप्रेस हायवेवर १२ किमी रांगा

**लोणावळा :** पुणे-मुंबई एक्सप्रेस हायवेवर सकाळपासूनच वाहनांच्या खंडाळा बोरघाटात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. सलग आलेल्या सुट्ट्यांमुळे मुंबईकडून पुण्याकडे येणारी वाहतूक संथ गतीने सुरू आहे. याचा नाहक त्रास प्रवाशांना सहन करावा लागत आहे.

पुणे-मुंबई एक्स्प्रेस वे वर गेल्या काही दिवसांपासून दरडी कोसळण्याचे प्रमाण वाढले आहे. ते आता सुरळीत झाले असून पावसाचे प्रमाण देखील कमी झाले आहे. सलग सुट्ट्या आल्याने अनेकजण आपल्या गावी जात असतात. मात्र, शनिवारी सकाळपासूनच खंडाळा घाटात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने मोठी वाहतूक कोंडी झाली आहे. मुंबईकडून पुण्याकडे जाणारी वाहतूक अत्यंत धीम्या गतीने सुरू आहे. पुणे-मुंबई महामार्गावर नेहमीच वाहतुकींची कोंडी पहायला मिळते. मात्र अनेक नागरिक फिरण्यासाठी, गावाकडे जाण्यासाठी बाहेर पडल्याने ही वाहतूक कोंडी झाल्याचे पाहायला मिळत आहे. १२ किमींच्या रांगा लागल्याने नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.

# डॉक्टरांशी गैरवर्तन पडणार महागात

## रुग्णावर उपचार नाकारण्याचा डॉक्टरांना मिळाला अधिकार

**सुराज्य/नागपूर**



डॉक्टर आणि रुग्णांच्या नातेवाईकांसाठी महत्त्वाची बातमी. आता रुग्ण किंवा त्यांच्या नातेवाईकांनी डॉक्टरांसोबत (Doctor) गैरवर्तवणूक केल्यास डॉक्टर संबंधित रुग्णावर उपचार करण्याचे नाकारू शकणार आहेत, नॅशनल मेडिकल कौन्सिलने त्यासंदर्भात निर्णय घेत डॉक्टरांना उपचार करणे नाकारण्याचा अधिकार दिला आहे. इंडियन मेडिकल असोसिएशन म्हणजेच, आयएमएने (IMA) यासंदर्भात समाधान व्यक्त करत या निर्णयामुळे डॉक्टरांची सुरक्षितता अबाधित राहील, असं मत व्यक्त केलं आहे. दरम्यान, नॅशनल मेडिकल कौन्सिलने डॉक्टरांना कोणत्याही औषधाचा ब्रँड (Medicine Branding) औषध किंवा उपकरणांचे समर्थन करण्यास किंवा त्यांची जाहिरात करण्यास मनाई केली आहे.

जर तुम्ही एखाद्या रुग्णालयात जाऊन डॉक्टरसोबत अपमानास्पद वागणार असाल, रुग्णासोबतचे नातेवाईक डॉक्टरसोबत गैरवर्तन करणार असतील, तर डॉक्टर संबंधित एखाद्या रुग्णाचा उपचार करण्याचे नाकारू शकणार आहे. नॅशनल मेडिकल कौन्सिलने त्यासंदर्भात निर्णय घेत डॉक्टरांना उपचार करण्यास नाकारण्याचा अधिकार दिला आहे. त्यामुळे डॉक्टरांसोबत गैरवर्तवणूक केल्यानंतर अमक्या डॉक्टरने आमच्या रुग्णावर उपचार नाकारले, हे सबब आता चालणार नाही. इंडियन मेडिकल असोसिएशनने नॅशनल मेडिकल कौन्सिलच्या या निर्णयावर समाधान व्यक्त केलं आहे.

नॅशनल मेडिकल कौन्सिलने आता डॉक्टरांनी रुग्णांवर उपचार नाकारण्याचा अधिकार दिल्यामुळे अशा स्थितीत डॉक्टरांची सुरक्षितता आणि अधिकार अबाधित राहू शकतील, अशी प्रतिक्रिया डॉ. वंदना काटे यांनी दिली आहे.

# कळवा रुग्णालयाचा भोंगळ कारभार

## उपचारांअभावी एका दिवसात ५ जणांचा मृत्यू

**सुराज्य/ठाणे**

जिल्हा रुग्णालयाचे काम सुरू असल्यामुळे गेल्या सहा महिन्यांपासून ठाणे महापालिकेचे कळव्यातील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय रुग्णांनी भरले आहे. त्यामुळे रुग्णांच्या उपचारांमध्ये सातत्याने हलगर्जी होत असल्याचा आरोप नातेवाईक करत आहेत. वाढत्या रुग्णसंख्येमुळे सध्याचे मनुष्यबळ तोकडे पडत असून उपचारांअभावी रुग्णांचा जीव जात असल्याची स्थिती आहे.

रुग्णालयाच्या प्रवेशद्वारावरच अनेक रुग्णांचे नातेवाईक बसलेले दिसतात. कोणी तासन्तास केसपेपरसाठी किंवा औषधासाठी रांगेत उभे असते. रुग्णासोबत कोणी नसेल तर त्याच्यावर उपचार होणे कठीण. दोन दिवसांपासून एक व्यक्ती वॉर्ड क्रमांक ९ च्या समोर उपचारांसाठी झोपून असल्याचे दिसले. चक्कर येत असल्यामुळे त्याला नीट चालताही येत नव्हते. याबाबत एका शिपायालाही सांगितले, त्यावर वॉर्डमधील डॉक्टरांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. नंतर दुसऱ्या एका वॉर्ड बॉयला सांगितल्यानंतर त्याला उपचारासाठी आयसीयू विभागात हलविण्यात आले. घटना दुसरी. गुरुवारी दुपारी १२ च्या सुमारास भाऊराव शिरोडकर या ३८ वर्षाच्या व्यक्तीला घोडबंदर परिसरात असताना छातीत



दुखत असल्याने तो तात्काळ रिक्षाने कळवा रुग्णालयात दाखल झाला. पण वेळेत उपचार सुरू न झाल्यामुळे त्यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे सांगण्यात आल्याचे विजय जाधव यांनी सांगितले. या घटना काही तासांमधील आहेत. दररोज शेकडो रुग्ण उपचारांसाठी दाखल होत असतात. त्यांच्याबाबतीत रुग्णालय कशी हलगर्जी करते, हे यावरून अधोरेखित होते.

### वॉर्ड रुग्णांनी भरला

कळवा रुग्णालयाची क्षमता ५०० बेडची आहे. मात्र सध्या ती दीडशे-दोनशेहून अधिक वाढल्यामुळे वॉर्डमध्ये जागा मिळेल तिथे बेड लावून उपचार केले जात आहे. एका वॉर्डमध्ये ४९ रुग्णांना ठेवले जात असताना सध्या ८९ रुग्णांवर एक नर्स उपचार करत आहे. त्यामुळे वाढत्या रुग्णसंख्येसमोर मनुष्यबळ व जागाही कमी पडत आहे.

### उपचारांसाठी वणवण

रुग्णालयात अनागोंदी माजली आहे. येथे दररोज ठाणे शहर, कळवा, मुंब्रा, दिवा, पालघर, उल्हासनगर, डोंबिवली, जव्हार, वाडा, भिवंडी अशा विविध भागांतून बाह्यरुग्ण विभागात सुमारे ५०० रुग्ण येतात. परंतु, केसपेपर काढण्यापासून ते डॉक्टरांकडे क्रमांक लागेपर्यंत एकेका रुग्णाला चार ते पाच तास लागतात. त्यात अनेकदा डॉक्टरही नसतात. त्यामुळे त्यांना रांगेत ताटकळत उभे राहावे लागते. बेड नसल्याचे कारण सांगून रुग्णांना दाखल करून घेतले जात नाही. परिणामी, दूरवरून आलेल्या रुग्णांवर उपचार होतच नाहीत.

### आठ डॉक्टरांना डेंग्यू

५०० बेडच्या क्षमतेला आवश्यक असलेले १२५ डॉक्टर, १४० निवासी डॉक्टर आणि १८० नर्स इतके मनुष्यबळ सध्या आहे. मात्र दिवसेंदिवस रुग्ण वाढत असल्यामुळे कामाचा ताण आणि मलेरिया, डेंग्यूचा वाढता संसर्ग यामुळे रुग्णालयातील आठ डॉक्टरांना डेंग्यू झाल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे मनुष्यबळ आणखी कमी झाले आहे.

# आयटी पार्कच्या शुभारंभाची जय्यत तयारी

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर शहरात पहिल्या आयटी पार्कच्या शुभारंभाची जय्यत तयारी झाली आहे. डोणगाव रोडवरील सलगरवाडी येथिल मैदानात साडेसात हजार स्वेकर फुटाचा भव्य शामियाना उभारण्यात आला आहे. तर ४० बाय ८०चे भव्य व्यसपिठ उभारण्यात आले आहे. २० हजार लोकांची बसण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. नागरिकांना कार्यकर्त्यांना कार्यक्रम व्यवस्थित पाहता यावा यासाठी स्टेजवर १२ बाय ४० फूटाचा तर व्यासपिठाच्या बाजूला ८ बाय १२ फूटाचे दोन एलईडी स्क्रिन बसवण्यात आले आहेत.

डोणगाव रोडवरील सलगरवाडी येथे रविवारी सकाळी दहा वाजता महेश कोठे यांच्यावतीने आर्यन्स ग्रुपच्या माध्यमातून सोलापूरातील पहिले आयटीपार्कचा शुभारंभ होत आहे. यासाठी राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार, माजी जलसंपदा मंत्री जयंत पाटील सोलापूर दौऱ्यांवर येत आहेत. यासाठी महेश कोठे आणि राष्ट्रवादी पक्षाच्यावतीने जय्यत तयारी केली आहे. शहरातील विविध चौकात तचेस कार्यक्रमाच्या ठिकाणी स्वागताचे डिजीटल बॅनर लावण्यात आले आहेत. कार्यक्रमाच्या ठिकाणी १५ ते २० हजार लोक बसतील असा भव्य शामियाना तयार करण्यात आला आहे. व्हिआयपी तसेच निमंत्रित आणि नागरिकासाठी बसण्याची वेगवेगळी सोय करण्यात आली आहे.

शरद पवार सकाळी आठ वाजता बारामती येथून बाय कार सोलापूर कडे येणार आहेत. सोलापूरात छत्रपती संभाजी महाराज चौक, आणि भैय्या चौकात राष्ट्रवादीच्या वतीने जंगी स्वागत केले जाणार आहे. ११ वाजता कार्यक्रमाच्या स्थळी आगमन होणार आहे. आयटीपार्कचा शुभारंभ आणि रोबोटचे आनावरण यावेळी केले जाणार आहे. कार्यक्रमानंतर बाय कार सांगोलाकडे रवाना होणार आहेत.

▶▶ साडेसात हजार स्क्वेअर फुटाचा भव्य शामियाना

▶▶ २० हजार लोकांची बसण्याची व्यवस्था, ४० बाय ८० चे भव्य स्टेज



### पवार असे येणार आणि जाणार

शरद पवार यांचे आगमन झाल्यानंतर सलगरवाडी येथे जाण्यासाठी पोलिस प्रशासनाच्या वतीने दोन मार्ग फिक्स केले आहेत. जुना पुना नाका छत्रपती शिवाजी महाराज चौक, भैय्या चौक , मरिआई चौक मार्गे सलगरवस्ती येथून कार्यक्रमस्थळी अथवा भैय्य चौक, रेल्वे स्टेशन, रामवाडी हॉस्पिल, येथून सुभ्रदाबाई मंगल कार्यालय मार्गे अक्षत माप मार्गे कार्यक्रम स्थळी जाण्याची शक्यता आहे. तर कार्यक्रम संपल्यानंतर डोणगाव मार्गे विजयपुर –पुणे बाय पास हायवे वरून सांगोला कडे रवाना होणार आहेत.



### भोजनासाठी विशेष निमंत्रित

कार्यक्रमानंतर उद्योजक सदानंद गायकवाड यांच्या सदानंद व्हिला या फार्म हाऊवर शाही भोजनाची सोय शरद पवार यांच्यासाठी केली आहे. त्यांच्या समवेत भोजनासाठी राष्ट्रवादीचे पदाधिकारी, व्यापारी, आर्यन्स ग्रुपचे संचालक आणि इतर आयटी क्षेत्रातील सीईओ यांच्यासह शंभर जणांना विशेष निमंत्रित केले आहे.

## 'मेरी माटी मेरा देश' कार्यक्रम रद्द करावा : सुराणा



✔ **सोलापूर** : जनतेच्या पैशाची उधळपट्टी करणारा 'मेरी माटी मेरा देश' हा निरर्थक कार्यक्रम तत्काळ रद्द करावा, अशी मागणी सोशलिस्ट पार्टीचे पन्नालाल सुराणा यांनी पत्रकार परिषदेत केली आहे.केंद्र सरकारच्या सांस्कृतिक विभाग प्रमुख सचिव यांनी विविध वृत्तपत्रांमध्ये या कार्यक्रमाविषयी माहिती दिली आहे. हा कार्यक्रम ९ ऑगस्ट पासून पुढे १८ दिवस चालवला जाणार आहे. प्रत्येक गावात शिलाफलक लावण्यात येणार आहे. हे कार्यक्रम तालुका, जिल्हा व राज्याच्या प्रमुख सरकारी कार्यालयात राबविले जाणार आहेत. सर्व सरकारी कर्मचाऱ्यांनी यात सहभागी व्हायचे आहे. नुकताच स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा झाला. त्यावेळी स्वातंत्र्यवीरांना नमन करण्यात आले होते, मग लगेच 'मेरी माटी मेरा देश' या नावाने दीर्घ कार्यक्रम करण्यात काय औचित्य आहे. खरे तर देशात मणीपुर मधील दोन समूहातील हिंसाचार, शेतकऱ्यांना लागणारे अनेक वस्तूंची जबर किंमत वाढ, रस्त्यावरील खड्डे असे अनेक ज्वलंत प्रश्न जनतेला भेडसावत आहेत. त्याबाबत ठोस व परिणामकारक उपाय करण्याऐवजी लोकांचे लक्ष निरर्थक गोष्टीतून इतरत्र वळविण्याचा हा कार्यक्रम आहे. 'माती आडवा, पाणी जिरवा' अशा कार्यक्रमावर आपण लक्ष केंद्रित करणे गरजेचे असल्याचेही पन्नालाल सुराणा यांनी यावेळी स्पष्ट केले. या पत्रकार परिषदेत ज्येष्ठ विचारवंत दत्ता गायकवाड उपस्थित होते.

## जल जीवन मिशन अंतर्गत विशेष सप्ताहाचे आयोजन

✔ **सोलापूर** : जल जीवन मिशन अंतर्गत जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायत स्तरावर कामे पूर्ण करण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली दि.११ आगस्ट ते १७ ऑगस्ट २०२३ या कालावधीत विशेष सप्ताहाचे आयोजन करण्यात आले जिल्हात विशेष सप्ताहास सुरूवात झाली आहे. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता ) अमोल जाधव यांनी दिली. दि.११ आगस्ट रोजी ग्रामपंचायत स्तरावरील लाभार्थींची कार्यशाळा आयोजित करणे, १२ आगस्ट रोजी ग्रामपंचायत स्तरावर प्राथमिक समन्वयक बैठक, जल जीवन मिशन ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती या नावाने नवीन खाते उघडणे, शाश्वत पाणी पुरवठा होणेसाठी स्त्रोत बळकटीकरण करणेसाठी उपाय योजना सुचविणे, १४ आगस्ट रोजी महिला ग्रामसभा मध्ये जल जीवन मिशन योजनेची माहिती सादर करणे व प्रत्येक घरास शंभर टक्के नळ जोडणी करणेसाठी मार्गदर्शन करणे, १५ आगस्ट रोजी ग्रामसभामध्ये पाणी पुरवठा व स्वच्छता समिती द्वारे जल जीवन विषयक माहिती ग्रामस्थाना कळविणे, योजनावर भांडवली खर्चावर होणारा दहा टक्के लोकवर्गणी वस्तू स्वरूपात श्रमदान आर्थिक स्वरूपात एकत्रित करणे, १६ आगस्ट रोजी हर घर जल अप प्ले स्टोर मधून किंवा जल जीवन मिशनच्या वेबसाईट वरून डाऊनलोड करून घेणे, १७ आगस्ट रोजी गृहभेटी, कोपरा बैठका,आयोजित करणे ग्रामस्थांचा सहभाग घेऊन गाव फेरी,शिवार फेरी. गृह भेटी, आदी कार्यक्रम होणार आहे.

## सोलापुरात १३ पासून सद्भावना केंद्र सुरू

✔ **सोलापूर** : स्वातंत्र्यदिनानिमित्त सोलापूर शहरात सिटी पार्क हॉटेलच्या मागे सद्भावना तिरंगा बंगला येथे दिनांक १३ ते १६ ऑगस्ट दरम्यान सद्भावना केंद्र सुरू होणार आहे, अशी माहिती सद्भावना सेवा दलाचे दिव्यकांत गांधी यांनी पत्रकार परिषदेत दिली. या केंद्रावर विविध प्रकारचे मिठाई तसेच तिरंगा ध्वज, बॅच , बिल्ले यासह विविध साहित्य उपलब्ध राहणार आहे. दिनांक १५ ऑगस्ट रोजी सकाळी ११:३० वाजता मान्यवरांच्या हस्ते भारत माता पूजन करण्यात येणार आहे. दिनांक २० ऑगस्ट रोजी विविध सामाजिक संस्था, अनाथ मुलांची शाळा आदी ठिकाणी लाडू वाटप करण्यात येणार आहे, असेही दिव्यकांत गांधी यांनी सांगितले. यीत्रह रोशन शेख, रूपा पारेख , ध्रुवेश गांधी, श्रुती गांधी, नारायण छाब्रीया, गणेश खेडकर, सुभाष झिरपे, प्रकाश लोढा आदी उपस्थित होते.

## शिवदारे प्रतिष्ठानचे जीवन गौरव पुरस्कार जाहीर

**डॉ. प्रधान, राम रेड्डी, डोके, दिवाणजी मानकरी**

✔ सुराज्य/सोलापूर



डॉ. राजीव प्रधान



डी. राम रेड्डी



किरण डोके



अभय दिवाणजी

येथील वि. गु. शिवदारे प्रतिष्ठानच्या वतीने सहकार महर्षी, स्वातंत्र्य सेनानी व माजी आमदार कै. वि. गु. शिवदारे (अण्णा) यांच्या जयंतीनिमित्त देण्यात येणारा जीवन गौरव' पुरस्कार यंदा डॉ. राजीव प्रधान (वैद्यकिय), उद्योजक डी. राम रेड्डी (सामाजिक), किरण डोके (कृषी), अभय दिवाणजी (पत्रकारिता) यांना जाहीर झाला आहे. प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजशेखर शिवदारे यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत या पुरस्काराची घोषणा केली.

सोलापुरातील किर्लोस्कर सभागृहात गुरुवार, दि. १७ ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेचार वाजता आयोजित समारंभात सोलापूरचे पोलीस आयुक्त डॉ. राजेंद्र माने यांच्या हस्ते पुरस्कार वितरण होणार आहे. रोख रक्कम २१ हजार रुपये व स्मृती चिन्ह असे पुरस्काराचे स्वरुप आहे. कार्यक्रमाप्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक व प्रख्यात कलावंत अभिराम भडकमकर यांचे 'महाराष्ट्राचे बदलते वातावरण आणि आपण' या विषयावर व्याख्यान होणार आहे.

पत्रकार परिषदेस सिद्धेश्वर बँकेचे चेअरमन प्रकाश वाले, व्हाईस चेअरमन नरेंद्र गंभिरे, प्रतिष्ठानचे पदाधिकारी डॉ. चनगोंडा हवीनाळे, प्रमोद बिराजदार, सुभाष मुनाळे, बाळसाहेब मुस्तारे, सूर्यकांत इसापुरे उपस्थित होते.

## विडी कामगारांच्या प्रश्नाकडे केंद्र व राज्याचे दुर्लक्ष : कारमपुरी

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर शहरातील व राज्यातील विडी कामगारांचे समस्या सोडविण्याकडे केंद्रातील मोदी सरकार व राज्यातील शिंदे सरकार जाणीवपूर्वक अक्षम दुर्लक्ष करीत असल्याचे गंभीर आरोप महाराष्ट्र कामगार सेनेचे प्रदेश अध्यक्ष विष्णू कारमपुरी यांनी केले आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष प्रणित महाराष्ट्र कामगार सेनेच्या वतीने वेडी उद्योग टिकवा-कामगार जगवा हा अभियाना अंतर्गत महारथयात्रा सुरू आहे. या अभियाना अंतर्गत १२ ऑगस्ट रोजी एम आय डी सी सुनील नगर येथे आयोजित केलेल्या जाहीर सभेत विष्णू कारमपुरी बोलत होते.

महारथयात्रा सभेत कामगार सेनेचे खजिनदार विठ्ठल कुराडकर उपाध्यक्ष लक्ष्मीबाई ईप्पा, शिवशंकर ढोकळे, शिवाजी कोळी, विभाग प्रमुख प्रशांत जक्का, यांची प्रमुख उपस्थिती होती कारमपुरी पुढे म्हणाले की केंद्र सरकार एकीकडे डिजिटल इंडिया बनविण्याचा स्वप्न दाखवते प्रत्यक्षात समाजातील गरीब उपेक्षित विडी कामगारांवर उपासमारीची वेळ आली आहे त्याकडे मात्र दुर्लक्ष करून १५ लाख रुपये बँकेत प्रत्येक कुटुंबाच्या नावाने टाकणार व २ कोटी बेरोजगारांना काम देणार असे खोटे आश्वासनाचे खैरात करीत आहे. याप्रसंगी विठ्ठल कुराडकर, शिवा ढोकळे, मल्लय्या स्वामी, प्रशांत जक्का, शिवानी पाटील,गोवर्धन मुदगल, गुरुनाथ कोळी, शरणाप्पा जगले, प्रभाकर मुणक्याल यांच्यासह सुनील नगर प्रभागातील कामगार बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## वृद्ध महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र हिसकावून पळवले

✔ सुराज्य/सोलापूर

फिर्यादी रोहिणी रोहिदास मुकरे (वय-६०,रा.आदित्य नगर,विजापूर रोड) या जेवण करून नेहमीप्रमाणे घरासमोरील रस्त्यावर फिरत होते.त्यावेळी कृष्णा कॉलनी बोर्ड समोर जात असताना नागुनारायणवाडी येथून आंबेडकर चौक या दिशेने एका दुचाकीवर दोन अज्ञात इसमांनी येऊन फिर्यादी यांच्या गळ्यातील अडीच तोळेचे सोन्याचे मंगळसूत्र इसका मारून तोडून आंबेडकर चौकाच्या दिशेने पळून गेले असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. ही घटना ११ ऑगस्ट रोजी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास नागूनारायणवाडी ते आंबेडकर चौक दरम्यान घडली.याप्रकरणी रोहिणी मुकरे यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून दोन अज्ञात दुचाकी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोसई गायकवाड हे करीत आहेत.

## तरुणाला फायटरने मारहाण

✔ **सोलापूर** : हॉटेल विरूध्द तक्रार करतो म्हणत तरुणाला फायटरने मारून जखमी केल्याची घटना हत्तुरगाव जवळ घडली.याप्रकरणी ऋषीकेश रेवणसिध्द बनसोडे (वय - २७, रा. आंबेडकर नगर, विजापूर रोड) यांनी विजापूर नाका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून शिनू गायकवाड (रा.सलगरवस्ती) व त्यांचे दोन अनोळखी मित्रांवर गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा तपास पोलिस नाईक शिर्के करत आहेत.




## लाकडाने मारहाण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

✔ **सोलापूर** : सोरेगाव येथील देवनगर येथे फिर्यादी श्रीदेवी बाळू भिमदे (वय-५०,रा.देवनगर,सोरेगाव) या दुकानावर असताना आरोपी सचिन मारूती भडकुंबे (रा. देव नगर,सोरेगाव,उत्तर सोलापूर) हा येऊन उधार भाजी मागू लागला.तेव्हा फिर्यादी यांनी पहिल्याची उधारी मागितली.यामुळे आरोपीने फिर्यादीला लाकडाने मारून जखमी केले.अशा आशयाची फिर्याद भिमदे यांनी दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून सचिन भडकुंबे याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा तपास पोलिस करत आहेत.

## चोरट्याने राजेंद्र चौकातून दुचाकीची पळवली

✔ **सोलापूर** : राजेंद्र चौकातील धार्मिक स्थळासमोर लावलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.ही घटना गुरूवारी दुपारी घडली.याप्रकरणी मुजम्मील फारूख बागवान (वय-२४,रा. शालीमार हाईटस,रंगा चौक) यांनी जेलरोड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास राठोड करत आहेत.

## भोसे ग्रामपंचायतीला ग्रामस्वच्छता विशेष पुरस्कार

✔ सुराज्य/सोलापूर

संत गाडगे बाबा ग्रामस्वच्छताअभियानात पॅंढरपूर तालुक्यातील भोसे ग्रामपंचायतीस आबासाहेब खेडकर विशेष पुरस्कार जाहिर झाला आहे. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान सन २०२०-२१ व २१-२२ या आर्थिक वर्षात पॅंढरपूर तालक्यातील भोसे या ग्रामपंचायतीस विशेष पुरस्कार जाहिर झाला आहे. या विशेष पुरस्कारा बद्दल जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे, प्रकल्प संचालक अमोल जाधव यांनी सरपंच गणेश पाटील व ग्रामविकास अधिकारी शरद भुजबळ यांचे अभिनंदन केले आहे. विभागीय उपायुक्त विजय मुळीक व त्यांचे सहकारी टीम ने या गावाची पाहणी केली होती. गटविकास अधिकारी प्रशांत काळे यांचे देखील या ग्रामपंचायतीच मोलाचे सहकार्य मिळाले आहे.

### लोकसहभागामुळे मिळाले यश : भुजबळ

सर्व शाळा, माध्यमिक शाळा, बचतगट , यांनी सरपंच गणेश पाटील यांचे आवाहनास प्रतिसाद देऊन चांगले काम केले. लोकसहभागातून विविध उपक्रम राबविल्याने पुणे विभागात दखल घेतली. जिल्हा परिषदेचा पाणी व स्वच्छता विभाग व ग्रामपंचायत विभाग, पंचायत समितीचे सहकार्य मिळाल्याचे ग्रामविकास अधिकारी शरद भुजबळ यांनी सांगितले.

संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियानात ही भोसे ग्रामपंचायत जिल्ह्यात पहिली आहे. या ग्रामपंचायतीने लोकसहभागातून विविध उपक्रम राबविले आहेत. वृक्षारोपना बरोबर क्युआर कोड द्वारे ग्रामपंचायतीचा टॅक्स जमा केला जातो.

स्वच्छ भारत मिशन ग्रामीण अंतर्गत स्वच्छतेसाठी गाव पातळी वर संवाद साधणे खुप अवघड असते. लोकांना वेळेत माहिती पोहोचविणे साठी गावातील सर्व कुटुंबातील एक सदस्य व्हाटसअॅप ग्रुप शी जोडला आहेत. वीजेच्या वेळा, गावातील स्वस्त धान्य दुकान, गॅस, आदी विविध सुविधा या ग्रुप वर देणेत येतात.

## मंगळवेढ्यात शरद पवार यांचे जंगी स्वागत होणार : अभिजित पाटील

✔ सुराज्य/लक्ष्मीदहिवडी



राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष शरद पवार रविवारी सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहेत. राष्ट्रवादी कॉंग्रेस मधील झालेल्या फुटी नंतर शरद पवार यांचा सोलापूर जिल्ह्यातील पहिलाच दौरा असणार आहे. सोलापूर येथील कार्यक्रम झाल्यानंतर सांगोला कडे जाताना मंगळवेढा नगरीत शरद पवार यांचे जंगी स्वागत करण्यात येणार असल्याचे श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अभिजीत पाटील यांनी सांगितले आहे.

मंगळवेढा तालुका हा शरद पवार यांच्या विचारांना मानणारा तालुका म्हणून ओळखला जातो. त्यामुळे शरद पवार यांच्या स्वागतासाठी कार्यकर्ते नेतेमंडळी यांनी जोरदार तयारी केली आहे. श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अभिजीत पाटील यांनी शरद पवार यांना मानणाऱ्या सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांना शिवप्रेमी चौक मंगळवेढा येथे जंगी स्वागतासाठी येण्याचे आवाहन केले आहे.

खा.पवार यांचे रविवारी मंगळवेढा येथे दुपारी १२वाजता माचाणूर चौक येथे स्वागत व तिथून शेतकरी हॉटेल पासून रॅली निघेल. तसेच मंगळवेढा शहर लगत पहिल्या ब्रीज पासून बोरळ नाक्यापासून दामाजी चौकाकडे रवाना होऊन दामाजी चौक येथे आगमन होणार आहे. तसेच शिवप्रेमी चौकात सत्कार समारंभाचे आयोजन असल्याचे सांगितले आहे.

## ऑक्सिजन प्लांटमधील तांब्याचे पाईप पळविले

✔ सुराज्य/करमाळा

येथील उपजिल्हा रुग्णालयात असलेल्या ऑक्सिजन प्लांटमधील १८ फूट लांबीचे तांब्याचे पाईप चोरट्याने पळविले . ही घटना ७ एप्रिल ते ११ एप्रिल या दरम्यान घडली. त्यामुळे रुग्णालयातील ऑक्सिजन पुरवठा करणारी यंत्रणा खंडित पडली आहे. यासंदर्भात रुग्णालयातील सुहास सुरेश आगलावे (रा.साडे) यांनी नुकतीच करमाळा पोलिसात फिर्याद दाखल केली . त्याप्रमाणे पोलिसांनी अनोळखी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. येथील उपजिल्हा रुग्णालयात ऑक्सिजनचे प्लांट आहे. त्या प्लांट मधून रुग्णालयात ऑक्सिजनचा पुरवठा केला जातो. चोरट्याने ७ ते ११ ऑगस्टच्या दरम्यान प्लांटला जोडलेले १८ फूट लांबीचे तांबा धातूचं पाईप चोरून नेले .असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास हवालदार शेळके करीत आहेत .

## छायाचित्रकार संघटनेच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार

**डॉ. मेतन फाऊंडेशनचा उपक्रम**

✔ सुराज्य/सोलापूर



डॉ. मेतन फाऊंडेशनतर्फे डॉ. मेतन हॉस्पिटल येथे . २०२३-२४ वर्षासाठी निवड झालेले सोलापुरातील दोन छायाचित्रकार संघटना, फोटोग्राफर बहुउद्देशीय संघ सोलापूर शहर व जिल्हा नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी अध्यक्ष श्रीकांत शिंदे , उपाध्यक्ष आरिफ भाई काझी, सचिव किरण सदाफुले, खजिनदार आनंद भोसले, सहसचिव शब्बीर शेख, सहखजिनदार श्रीकांत भंडारे आणि फोटोग्राफर वेल्फेअर असोसिएशन सोलापूर नूतन पदाधिकारी : अध्यक्ष सुभाष सण्णके, उपाध्यक्ष प्रशांत उडता, सचिव रवींद्र गोगी, कार्याध्यक्ष श्री पुरुषोत्तम वग्गा, सहसचिव गणेश विश्वनाथ, खजिनदार श्रीधर अंबाल, सहखजिनदार तिरुपती वग्गा, तसेच महाराष्ट्रात प्रथमच एच.पी. इंडिगो ७-के प्रेस प्रिंटिंग मशीन सोलापूरकरांच्या सेवेसाठी रुजू करणारे राजेश जी कटकधोंड (के.राज) आणि एच.पी. इंडिगो ५५०० मशीनचे पदार्पण करणारे रवींद्र गोगी यांचा सत्कार करण्यात आला.

सुरुवातीला महेश बनसोडे यांनी सर्वांचे स्वागत करून डॉ. मेतन फाऊंडेशनबद्दल माहिती दिली. डॉ. व्यंकटेश मेतन यांनी नूतन अध्यक्ष, सचिव, खजिनदार व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्या दिल्या. सत्काराला उद्देशून दोन्ही नूतन अध्यक्षांनी हा सत्कार सभारंभ आयोजित करून मार्गदर्शन केल्याबद्दल डॉ. मेतन फाऊंडेशनचे आभार मानले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन महेश बनसोडे यांनी केले. या सभारंभास किशोर मोरे, संदीप सरवदे, लक्ष्मण सुतार, श्याम जाधव, जगदीश बिराजदार, रवी वडनाल, बसवराज कुंभार, योगेश मच्चा , प्रवीण क्यातम, अक्षय चिप्पा, श्याम डांगे, व्यंकटेश पोतराज, प्रशांत चिंता, नदीम हरकारे, सिद्धाराम सक्करगी, संतोष पाटील उपस्थित होते.

## उत्तम सुर्वे यांची प्रमोशनवर बदली



✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर जिल्हा परिषदेचे उपमुख्य वित्त व लेखा अधिकारी उत्तम सुर्वे यांची प्रमोशन वर बदली झाली आहे. रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या मुख्य वित्त लेखा अधिकारीपदी त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

शासनाच्या वित्त विभागाने राज्यातील ५५ अधिकाऱ्यांच्या सहाय्यक संचालक पदावरून उपसंचालक पदावर पदोन्नती दिली आहे. त्यामध्ये सोलापूर झेडपीचे उत्तम सुर्वे यांचा समावेश आहे. सोलापूर जिल्हा परिषदेला मात्र अधिकारी देण्यात आलेला नाही. आता हा पदभार कोणाला मिळणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तत्कालीन मुख्य वित्त अधिकारी अजय सिंह पवार यांचे प्रमोशन पर बदली झाल्यानंतर त्यांचा पदभार उत्तम सुर्वे यांच्याकडे होता.